दैनिक
राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com
बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–६२ बुधवार दि.१२ जून २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये

संपादकीय

मान्सूनचे शुभागमन!

नैऋत्य मोसमी वा–यांनी महाराष्ट्रात दमदार हजेरी लावली आहे. रविवारी पुणे, मुंबईसह मराठवाड्यात मान्सूनचे दमदार आगमन झाले. केरळमध्ये मान्सून ३० मे रोजी दाखल झाल्यानंतर ६ जून रोजी गोव्याचा उर्वरित भाग कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणासह महाराष्ट्रात दाखल झाला होता. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, कोल्हापूर, सांगली, सोलापूरमध्ये मान्सूनने आपले अस्तित्व दाखवले. रविवारी राज्याच्या विविध भागात पाऊस झाला. १० ते १३ जून दरम्यान काही ठिकाणी विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वा–यासह मुसळधार पाऊस तसेच मध्य महाराष्ट्र, कोकण, मराठवाड्यात काही ठिकाणी अतिवृष्टी होण्याचा इशारा देण्यात आला आहे.

मोहन मांझी होणार ओडिशाचे मुख्यमंत्री

भुवनेश्वर– ओडिशाच्या मुख्यमंत्रीपदी मोहन मांझी यांच्या नावावर अंतिम शिक्कामोर्तब झाले आहे. मोहन मांझी हे बुधवारी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार असल्याची माहिती आहे. त्यांच्यासोबत दोन उपमुख्यमंत्री असणार आहेत. केवी सिंह देव आणि प्रवती परिदा हे दोघेजण उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत. केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह यांनी मोहन मांझी यांच्या नावाची घोषणा केली. भाजपने पहिल्यांदाच ओडिशात सत्ता मिळवली असून १४७ पैकी ७८ जागा मिळवल्या आहेत.

पिककर्ज वाटपात बँकांची कंजूसी!

राज्यातील शेतकऱ्यांवर मोठे संकट; बीड जिल्ह्यात उद्दिष्टाच्या एकोणीस टक्केच वाटप

बीड । प्रतिनिधी

राज्यात जूनच्या सुरुवातीला चांगला पाऊस झाला असून अनेक ठिकाणी पेरण्या सुरु झाल्या आहेत. पेरण्या करण्यासाठी बी–बियाणे, खते खरेदी करण्यासाठी भरमसाठ पैसा लागत असताना राज्यातील बँका मात्र पिककर्ज देण्यामध्ये कंजूसी करीत असल्याचे समोर आले आहे. बीड जिल्ह्यासाठी खरीप पिकासाठी एक हजार सातशे सात कोटी रुपये पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट आहे. मात्र दिनांक १० जून पर्यंत केवळ तिनशे बावीस कोटी रुपये पीक कर्ज वाटप झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पीक कर्ज कोण देणार आणि कधी देणार ? असा प्रश्न सध्या उपस्थित केला जात आहे.

गेल्या वर्षी राज्यात दुष्काळ पडला असतानाही शेतकऱ्यांना शासनाकडून मदत मिळाली नाही. शेतकऱ्यांच्या बाबतीत प्रतिकूल वातावरण असताना मंत्री आणि नेते मात्र निवडणुकांमध्ये व्यस्त होते. सध्या राज्यात बहुतेक भागात पावसाने हजेरी लावली आहे. काही ठिकाणी पेरण्या सुरु झाल्या तर बऱ्याच भागात कापूस लागवड उरकण्याच्या मार्गावर आहे. यावेळी बी–बियाणे आणि खते खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांना भरमसाठ पैसे लागतात. अशा अडचणीच्या वेळी शेतकऱ्यांना पिककर्जाचा आधार असतो. मात्र यंदा पिककर्ज देण्यात बँका कंजूसी करीत असल्याची बाब समोर आली आहे. बीड जिल्ह्यात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला अपेक्षेप्रमाणे आणि त्यांच्या घोटाळ्यांच्या कामाप्रमाणे ४२० कोटी रुपयांचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे. राष्ट्रीयकृत बँकांना ८३५ कोटी रुपयांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. तर ग्रामीण बँकेला ४५२ कोटी रुपयांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. जिल्हा बँकेने तीस कोटी एकोणवीस लाख रुपयांचे पिक कर्ज वाटप केले आहे. वाटपाची ही टक्केवारी केवळ ७.१९% एवढी आहे. राष्ट्रीयकृत बँकांनी १६० कोटी ६० लाख रुपये पीक कर्ज वाटप केले आहे. वाटपाची ही टक्केवारी १९.२३% एवढी आहे.

◀◀ पान २ वर

जिल्हाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना पिककर्ज मिळवून द्यावे–ॲड. अजित देशमुख

पिक कर्ज वेळीच वाटप व्हावे, त्याचप्रमाणे गरजवंत शेतकऱ्यांना पेरणीसाठी तात्काळ पैसे उपलब्ध व्हावेत, म्हणून जिल्हाधिकाऱ्यांनी ठोस भूमिका घेणे गरजेचे आहे. त्यामुळे या संदर्भातील बैठक त्यांनी घेऊन योग्य ते आदेश सर्व बँकांना द्यावेत. शेतकऱ्यांच्या समस्या सोडवाव्यात, अशी मागणी ॲड. अजित देशमुख यांनी केली आहे.

विनोद तावडे भाजपचे प्रदेशाध्यक्ष?

चंद्रकांत पाटलांच्या वक्तव्याने चर्चा

मुंबई । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीत भाजपला महाराष्ट्रात अपेक्षित यश मिळाले नाही. त्यामुळे केंद्रात स्वबळावर सरकार स्थापन झाले नाही. त्यातच सहा महिन्यावर विधानसभा निवडणुक आल्याने मराठा समाजाची मते आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी मराठा चेहरा म्हणून विनोद तावडे यांच्या खांद्यावर महाराष्ट्र भाजपची धुरा दिली जाण्याची शक्यता आहे. त्यातच मंत्री चंद्रकांत पाटील यांनी तावडे यांच्यावर राज्यात मोठी जबाबदारी दिली जावू शकते, असे वक्तव्य केल्याने त्याला एक प्रकारे दुजोरा मिळत आहे.

विनोद तावडे यांना भविष्यात मोठी जबाबदारी मिळणार असल्याचे वक्तव्य भाजपा नेते आणि मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले आहे. तर विनोद तावडे यांच्यासाठी अनेक पर्यायांची चर्चा सुरू असल्याचेही चंद्रकांत पाटील यांनी म्हटले

◀◀ पान २ वर

महायुतीसाठी धक्का; राज्यात सत्तापरिवर्तन अटळ?

लोकसभा निवडणुकीच्या निकालावरुन पोल; महाविकास आघाडीला यश मिळण्याची शक्यता

मुंबई । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीच्या निकालानुसार विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार येण्याची शक्यता आहे. लोकसभेच्या निकालानुसार महाराष्ट्रात महाविकास आघाडी विधानसभेत १५८ जागा विजयी होऊ शकतात. तर महायुतीला १२७ जागांवर यश मिळू शकतो. त्यामुळे महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार स्थापन होण्याची शक्यता आहे.

लोकसभा निवडणुकीत महायुतीला महाविकास आघाडीने धोबीपछाड केले. दिग्गज नेते यावेळी पराभूत झाले असून लोकसभेप्रमाणेच विधानसभा

◀◀ पान २ वर

» नेमका कल काय?

महाराष्ट्रात सध्या भाजपचे १०५ आमदार आहेत. पोलनुसार, आगामी विधानसभा निवडणुकीत भाजपच्या १०५ आमदारांपैकी ४२ आमदारांच्या मतदारसंघात महाविकास आघाडीच्या उमेदवारांना लीड मिळण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या ४० आमदारांपैकी १७ आमदारांच्या मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडीच्या उमेदवारांना लीड मिळण्याची शक्यता आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पक्षाच्या ४० आमदारांपैकी २५ आमदारांच्या मतदारसंघात महायुतीचे उमेदवार पिछाडीवर असण्याची शक्यता आहे. लोकसभेत महायुतीच्या विद्यमान ८४ आमदारांच्या विधानसभेत महाविकास आघाडी पुढे आहे.

» कुणाला किती जागा मिळणार?

पोलनुसार, शिवसेना ठाकरे गटाचे सध्या १५ आमदार आहेत. त्यांना आणखी १५ आमदार वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे ठाकरे गटाचे ३० आमदार जिंकून येण्याची शक्यता आहे. काँग्रेसचे सध्या ४५ आमदार आहेत. त्यांच्या २७ जागा वाढणार असून त्यांच्या आमदारांची संख्या ही थेट ७२ वर जाण्याची शक्यता आहे. शरद पवार गटाचे सध्या १२ आमदार आहेत. त्यांचे ४० आमदार वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत शरद पवार गटाचे ५२ आमदार निवडून येण्याची शक्यता आहे. यात भाजपला ४५ जागांचा तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार आणि शिंदे शिवसेनेला फटका बसू शकेल.

सोन्याच्या दरात घसरण

मुंबई : सोन्याची खरेदी करणाऱ्यांसाठी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. सोन्याच्या दरात घसरण झाली आहे. सोन्याचे भाव मे महिन्याच्या विक्रमी उच्चांकावरून जवळपास ५ टक्क्यांनी घसरले आहेत. देशांतर्गत बाजाराबरोबरच आंतरराष्ट्रीय बाजारात देखील सोन्याच्या दरात घसरण झाली आहे.

◀◀ पान २ वर

बजरंग बप्पांचा अजित पवारांना फोन

मिटकरींच्या दाव्याने राजकीय वर्तुळात खळबळ

बीड । प्रतिनिधी

बीडमध्ये पंकजा मुंडे यांना पराभूत करणारे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे 'जायंट किलर' खासदार बजरंग सोनवणे यांनी अजित पवारांना फोन केल्याचा दावा अजित पवार गटाचे आमदार अमोल मिटकरी यांनी केली आहे. अमोल मिटकरी ट्विटच्या माध्यमातून बीडचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे अजित पवार यांच्या

◀◀ पान २ वर

खा. बजरंग सोनवणे यांचे स्पष्टीकरण

बजरंग सोनावणे म्हणाले, अमोल मिटकरींनी लोकसभेत एखादा खासदार निवडून आणायला पाहिजे होता त्यानंतर त्यांनी दुसऱ्यांविषयी बोलावे. मी आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत शरद पवारांसोबत राहणार असल्याचे सांगून फोन केल्या बाबतचा दावा फेटाळून लावला. अमोल मिटकरी यांनी गोंधळ निर्माण करण्याचे प्रकार अमोल मिटकरींनी बंद करावे. अगोदर एखादा ग्रामपंचायतीचा सदस्य निवडून आणावा नंतर दुसऱ्यांचे बोलावे. मी फोन करण्याचा संबंधच कुठे येतो? राजकारणाच्या प्रक्रियेत काही वैयक्तिक विषय असतात. वैयक्तिक विषयाला राजकारणात आणतात. मिटकरींनी दिशाभूल करण्याचा प्रकार बंद करावा, असे खा. सोनवणे म्हणाले.

लोकसभेतील यशानंतर उध्दव ठाकरेंकडून जिल्हाप्रमुखांच्या पाठीवर शाबासकीची थाप

शिवसेना भवनात पार पडली जिल्हाप्रमुखांची बैठक; जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुतेंचे कौतूक

मुंबई । प्रतिनिधी

शिवसेना भवन, मुंबई येथे ठाकरे शिवसेनेची राज्यातील सर्व जिल्हाप्रमुख यांची लोकसभा निवडणुकीतील यशानंतर महत्वाची बैठक पार पडली. यावेळी उध्दव ठाकरे यांनी लोकसभा निवडणुकीत चांगले काम केल्याबद्दल राज्यातील सर्वच जिल्हाप्रमुखांच्या पाठीवर शाबासकीची थाप टाकली. यावेळी बीड जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांचेही कौतूक करण्यात आले.

लोकसभा निवडणुकीत ठाकरे शिवसेनेला ९ जागा मिळाल्या. जागा मतदार संघात मित्रपक्षांचे उमेदवार होते. त्याठिकाणी शिवसेनेच्या जिल्हाप्रमुखांनी संबंधीत उचलला आहे. बीड लोकसभा मतदार संघातही राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या विजयासाठी महत्वाची भुमिका शिवसेनेच्या सर्वच जिल्हाप्रमुखांनी बजावली आहे. जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांच्या कार्याचे यावेळी कौतूक करीत त्यांच्या पाठीवर पक्षनेतृत्वाने शबासकीची थाप टाकली आहे. तसेच लोकसभेप्रमाणे विधानसभा निवडणुकीतही चांगले कार्य कसे करता येईल याबाबत उध्दव ठाकरे, खा. संजय राऊत यांनी मार्गदर्शन केले.

या प्रसंगी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी बीड जिल्ह्याचा वतीने लोकसभेचा आढावा

◀◀ पान २ वर

उमेदवाराच्या विजयात सिंहाचा वाटा

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड,दि.११ जून २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू : ८.०० क्विंटल	२,३०१	३,३००	२,५५५
ज्वारी/हायब्रिड : ४१.५० क्विंटल	२,१५१	३,२६०	२,३७८
मूग : ०.५० क्विंटल	७,८१०	७,८१०	७,८१०
तूर : १०.५० क्विंटल	९,४००	११,५००	१०,८६०
उडीद : ९.५० क्विंटल	२,३३२	२,६००	२,४४४
बाजरी: १३.५० क्विंटल	१,७१०	२,५७५	२,३४३
चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल	१,७००	६,३००	४,०००
सोयाबीन: २४९.०० क्विंटल	४,४००	४,४७१	४,४३६
हरभरा: २७.०० क्विंटल	६,४००	६,५५०	६,४७५

आषाढी वारीसाठी यंदा एसटी थेट तुमच्या गावात

» ५००० जादा बसेस सोडणार; गावातून ४० प्रवाशी असल्यास होणार सोय

मुंबई । प्रतिनिधी

एकीकडे पावसाची दमदार सुरुवात झाल्याने बळीराजा सुखावला असून पेरणीच्या कामाची तयारी करत आहेत. पेरणीनंतर वारकरी, शेतकरी विठुरायाच्या जपनामात मग्न होणार आहेत. दुसरीकडे पंढरीच्या वाराची तयारीही प्रशासनाकडून सुरू झली आहे. आषाढी यात्रेनिमित्त विठू नामाचा जयघोष करीत श्री श्रेत्र पंढरपुरला जाणाऱ्या भाविक प्रवाशांसाठी एसटीने यात्राकाळात ५ हजार विशेष बस सोडण्याचे नियोजन केले आहे. विशेष म्हणजे यंदा राज्यातील कोणत्याही गावातून ४० अथवा त्या पेक्षा जास्त भाविक प्रवाशांनी एकत्रित मागणी केल्यास त्यांना थेट पंढरपूरला जाण्यासाठी त्यांच्या गावातून एसटी बस उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यासाठी भाविक प्रवाशांनी आपल्या जवळच्या आगारात

◀◀ पान २ वर

फुकट्या प्रवाशांना लगाम

यात्रा काळामध्ये गर्दीचा फायदा घेऊन तिकीट न काढणे, वाहकाकडून तिकीट मागून न घेणे अशाप्रकारे फुकट प्रवास करू इच्छिणाऱ्या प्रवाशांना लगाम घालण्यासाठी एसटीने पंढरपूरला जाणाऱ्या विविध मार्गावर १२ ठिकाणी तपासणी नाके उभारण्याचे नियोजन केले आहे, अशा फुकटया प्रवाशांना अटकाव करण्यासाठी एसटीचे २०० सुरक्षा कर्मचारी व अधिकारी यात्रा काळात २४ तास नजर ठेवून असणार आहेत.

चार तात्पूर्ती बस स्थानके उभारणार

वारकरी, भाविक तसेच पर्यटकांची होणारी गर्दी पाहता एकाच स्थानकावर गर्दी होऊ नये यासाठी प्रवाशांच्या सोयीसाठी यात्रा कालावधीत पंढरपूर येथे चंद्रभागा, भिमा, पांडुरंग (आयटीआय कॉलेज) व विठ्ठल कारखाना यात्रा स्थानक अशी चार तात्पुरती बस स्थानके उभारण्यात येणार आहेत.

अग्रलेख

मान्सूनचे शुभागमन!

नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी महाराष्ट्रात दमदार हजेरी लावली आहे. रविवारी पुणे, मुंबईसह मराठवाड्यात मान्सूनचे दमदार आगमन झाले. केरळमध्ये मान्सून ३० मे रोजी दाखल झाल्यानंतर ६ जून रोजी गोव्याचा उर्वरित भाग कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणासह महाराष्ट्रात दाखल झाला होता. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, कोल्हापूर, सांगली, सोलापूरमध्ये मान्सूनने आपले अस्तित्व दाखवले. रविवारी राज्याच्या विविध भागात पाऊस झाला. १० ते १३ जून दरम्यान काही ठिकाणी विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वा–यासह मुसळधार पाऊस तसेच मध्य महाराष्ट्र, कोकण, मराठवाड्यात काही ठिकाणी अतिवृष्टी होण्याचा इशारा देण्यात आला आहे.

मराठवाड्यात मान्सूनचे दमदार आगमन झाले असून रविवारी विभागातील ४५ मंडळांत अतिवृष्टीची नोंद झाली. यात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ३७ मंडळांचा समावेश आहे. गत दहा दिवसांत ५१ मंडळांमध्ये अतिवृष्टी झाल्याने शेतक–यांनी पेरणीची कामे सुरू केली आहेत. गत काही दिवसांपासून मराठवाड्यात पावसाने नियमित हजेरी लावली आहे. सोमवारी लातूर शहरासह जिल्ह्यात कोरडे वातावरण होते परंतु सायंकाळी साडेसहानंतर पाऊस सुरू झाला. तो रात्री उशिरापर्यंत धो–धो बरसला. लातूरसह निलंगा, औसा, शिरूर अनंतपाळ, जळकोट, चाकूर, अहमदपूर, उदगीर तालुक्यात पावसाने जोरदार हजेरी लावली. परभणी जिल्ह्यातही अनेक ठिकाणी ढगफुटीसदृश्य पाऊस झाला. त्यामुळे शेतशिवारात पाणीच पाणी झाले. ओढे, नाले तुडुंब भरून वाहू लागले. मानोलीत ओढ्यात एक महिला वाहून गेली.

मानवत तालुक्यातील मानोली शिवारात सोमवारी दुपारी ४ च्या सुमारास ढगफुटी झाली. त्यामुळे आलेल्या पुरात दोन महिला वाहून गेल्या. पैकी एक महिला झाडाला अडकल्याने वाचली तर दुस–या महिलेचा उशिरापर्यंत शोध लागला नव्हता.

लातूर जिल्ह्यात रोजच पावसाचे बरसणे सुरू आहे. दिवसभर उन्हाची तीव्रता असते. सायंकाळी मात्र आकाशात ढग दाटून येतात आणि बघता बघता ढगाला कळ लागते. सोमवारीही रात्रभर पाऊस सुरू होता. जिल्ह्यात सर्वत्र जोरदार पाऊस झाल्याने निलंगा, औसा तालुक्यात ओढे, नाले तुडुंब भरून वाहू लागले. निलंगा तालुक्यात माकणी थोर आणि जळकोट तालुक्यात घोणसी येथे वीज पडून दोन म्हशी दगावल्या. परभणी जिल्ह्यातही जोरदार पाऊस झाला.

नांदेड जिल्ह्यात ढगाळ वातावरण होते तर काही भागात पाऊस झाला. बीड, हिंगोलीतही ब–याच भागात पाऊस झाला. धाराशिव जिल्ह्यात काही भागात रिमझिम पाऊस झाला. रात्री ढगाळ वातावरण होते. ‘मिरगा’चा चांगला पाऊस झाल्याने शेतक–यांची पेरणीसाठी लगबग सुरू झाली आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार राज्यात मान्सूनचे आगमन झाले असून ‘पावशा’चा पेर्ते व्हा.. पेर्ते व्हा असा संदेश मिळाल्याने शेतक–यांनी पेरणीची तयारी केली आहे.

काही भागात पेरण्यांना सुरुवात झाली आहे. ग्रामीण भागातील शेतकरी पावशाचा संकेत लगेच ओळखतो. बदलत्या काळात तंत्रज्ञानाच्या साह्याने विविध संस्थांनी हवामानाचे किंवा पावसाचे अंदाज वर्तवले तरी त्यावर फारसा विश्वास न ठेवता सर्वसामान्य शेतकरी जुन्या पारंपरिक संकेतावरच अधिक विश्वास ठेवतो. निसर्गात होणा–या बदलांची सर्वप्रथम जाणीव प्राणी–पक्ष्यांना होते. त्या जाणिवेतूनच प्राणी–पक्ष्यांच्या हालचाली व स्वरात बदल होत असतात. या बदलांच्या संकेतावरून शेतकरीवर्ग मान्सूनचे आगमन कधी होईल याचा अंदाज बांधतो. त्यानुसार मृग नक्षत्रात शेतीची कामे वेग घेऊ लागतात. मृग नक्षत्रात लाल रंगाचे मखमली नाजूक किडे शेत शिवारात वावरू लागल्यावर पाऊस हमखास बरसणार अशी अटकळ शेतकरी बांधतो. अर्थात हे पारंपरिक अंदाज आहेत. अलिकडे वेधशाळांनी वर्तवलेल्या अंदाजानुसार त्या–त्या तारखेला पावसाचे आगमन होत आहे. सर्वसाधारपणे ७ जूनला सर्वदूर मृग नक्षत्राचा पाऊस होतो. गतवर्षी अंदाज वर्तवूनही ७ जूनला पाऊस बरसला नव्हता. नंतर काही दिवसांनी जोरदार बरसला होता मात्र, त्यानंतर सुमारे दोन आठवडे त्याने दडी मारली होती. यंदा मात्र पाऊस वेळेवर येईल असा अंदाज वेधशाळांनी वर्तवला होता आणि त्याप्रमाणे ३–४ जूनपासूनच महाराष्ट्रात काही भागात पावसाचे आगमन झाले. पुणे, कोल्हापूर, सिंधुदुर्ग भागात पहिल्याच पावसाने लोकांची दाणादाण उडवली. पुण्यात केवळ दोन तासांत ९० मि.मी. पाऊस झाला. कोल्हापूरमध्येही वादळी वा–यासह पाऊस झाला. वेळेआधीच दाखल झालेल्या पावसामुळे यंदाचा संपूर्ण पावसाळा जोरदार असेल असा अंदाज बांधण्यास हरकत नाही. सुरुवातीच्या पावसानेच लोकांची दाणादाण उडत असेल तर प्रत्यक्ष आषाढातल्या पावसात काय परिस्थिती उद्भवेल याचाही अंदाज येऊ शकतो. वेळेआधी दाखल झालेल्या वरुणराजाचे स्वागत करताना लोकांचे अनाठायी नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. महिनाभरापूर्वी राज्यात तापमान प्रचंड वाढले होते. जवळपास सर्व धरणे कोरडीठाक पडली होती. मुंबईसारख्या महानगराला पाणीपुरवठा करणा–या तलावांमध्ये जेमतेम महिनाभर पुरेल इतकेच पाणी शिल्लक होते. ग्रामीण भागातील पाणीटंचाईबद्दल न बोललेलेच बरे? या भागात पाणी मिळवण्यासाठी प्रचंड परिश्रम घ्यावे लागत आहेत. आता योग्य मुहूर्तावर पावसाचे आगमन झाल्याने पिण्याच्या पाण्याची टंचाई काही प्रमाणात दूर होईल. शिवाय जनावरांच्या चारा–पाण्याचा प्रश्नही ब–यापैकी मार्गी लागू शकेल. पावसाचे हे शुभागमन संपूर्ण वर्षासाठीसुद्धा शुभ संकेत देणारे ठरू शकेल. पुरेशा प्रमाणात पाऊस होणार असेल तर योग्य पद्धतीने पाण्याचा वापर करण्याची तयारी सरकारी यंत्रणांनी ठेवली पाहिजे. म्हणजेच पाऊस कमी झाला तरी संकटाचा सामना करावा लागतो आणि पाऊस जास्त झाला तरी संकटाचा सामना करावा लागतो! संपूर्ण देशाची अर्थव्यवस्था सांभाळणारा मान्सून यंदा वेळेआधीच दाखल झाला आहे म्हणून ‘हॅप्पी मान्सून’ असे म्हणूया!

आष्टीचे भूमिपुत्र सपोनि विनोद चव्हाण यांना पोलिस निरीक्षकपदी पदोन्नती

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील डोंगरगण येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद चव्हाण यांची पोलीस निरीक्षक म्हणून पदोन्नती झाली आहे.ते गेल्या चौदा वर्षापासून पोलीस सेवेत असून पदोन्नती होताच शासनाला गडचिरोली येथे सेवा करण्यासाठी विनंती केली आहे .

नगर जिल्ह्यात पोलिस दलात खमक्या अधिकारी म्हणून कारकिर्द गाजविलेले आणि सध्या सोलापूर येथील विजापूर नाका पोलिस ठाण्यात कार्यरत असलेले सहायक पोलिस निरीक्षक विनोद चव्हाण यांना पोलिस निरीक्षकपदी पदोन्नती मिळाली. त्यांच्या पसंतीप्रमाणे त्यांना गडचिरोडी येथे नियुक्ती मिळाली. त्यामुळे त्याचे नगर व बीड जिल्ह्यातून अभिनंदन होत आहे. पोलिस निरीक्षक विनोद दिलीप चव्हाण यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगद्वारे २०१० मध्ये पीएसआय (पोलिस उपनिरीक्षक) पदी निवड झाली होती. नाशिक येथे मुख्य प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर २०११ ते २०१४ पर्यंत त्यांनी गडचिरोली जिल्ह्यात नक्षल विरोधी पथक – ६० कमांडो मध्ये काम केले. गडचिरोली जिल्ह्यातील कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर त्यांची सहायक पोलिस निरीक्षकपदी पदोन्नती झाली. त्यांना नगर जिल्ह्यातील नगर तालुका पोलिस ठाणे मिळाले. तत्कालीन पोलिस अधीक्षक लखमी गौतम, रंजन कुमार शर्मा, सौरभ त्रिपाठी ,डीवायएसपी बजरंग बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी उत्कृष्ट काम केले. त्यानंतर भिंगार कॅम्प पोलिस ठाणे, कोतवाली पोलिस ठाणे, एमआयडीसी पोलिस ठाण्याचा प्रभारी अधिकारी म्हणून कार्यभार सांभाळला.

या कार्यकाळात त्यांनी अनेक क्लिष्ट गुन्ह्याची उकल केली. तर अनेक गरजूंना न्याय मिळून देण्यात महत्त्वाची भूमिका बजाविली. २०१९ मध्ये नगरमधून त्यांची यवतमाळ येथे बदली झाली. यवतमाळ स्थानिक गुन्हे शाखा, पारवा पोलिस ठाणे (प्रभारी अधिकारी) व पोलिस अधीक्षक कार्यालय येथे सचोटीने कामकाज केले. मार्च २०२४ मध्ये त्यांची सोलापूर आयुक्तालय येथे बदली झाली. सध्या ते विजापूर नाका पोलिस ठाणे येथे कार्यरत आहेत. १० जून २०२४ रोजी पोलिस विभागमार्फत काढलेले आदेशात त्यांना पोलिस निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली. त्यांच्या पसंतीप्रमाणे त्यांची गडचिरोली जिल्यात बदली झाली आहे. गडचिरोलीमधील नोकरी ही पोलिस दलातील सर्वात कठीण कार्यकाळ मानला जातो. परंतु, देशसेवा करिता विनोद चव्हाण यांनी कायम गडचिरोली येथे नोकरीस पसंती देणे स्वीकारले आहे. पोलिस निरीक्षक पदी पदोन्नती झाल्याचे त्यांचे मित्र, नातेवाईक, सहकारी अधिकारी व वरिष्ठ अधिकार्यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

मोदींच्या मंत्रिमंडळात २० नेते घराणेशाहीवाले

महाराष्ट्रातून दोघांचे नाव; राहुल गांधींनी शेअर केली यादी

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

निवडणूक प्रचारात घराणेशाहीच्या मुद्दयावरुन नरेंद्र मोदींसह भाजप नेत्यांनी कॉंग्रेसवर जोरदार टीका केली होती. तर, नरेंद्र मोदींकडून शहजादे म्हणत राहुल गांधींना लक्ष्य केले जाते. मात्र, मोदी सरकारच्या मंत्रिमंडळात तब्बल २० नेते घराणेशाहीतून आलेले आहेत. स्वत: राहुल गांधींनी ट्विट करुन यासंदर्भात माहिती दिली, तसेच परिवार मंडल असे म्हणत राहुल गांधींनी भाजप व नरेंद्र मोदींवर टीका केली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी तिसऱ्यांदाच देशाचे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. मोदींसमवेत तब्बल ७२ खासदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली असून महाराष्ट्रातून ६ जणांना मंत्रिपदाची संधी देण्यात आली आहे. त्यात, महाराष्ट्राच्या वाट्याला दोन कॅबिनेट, एक स्वतंत्र प्रभार आणि ३ राज्यमंत्रीपद मिळाली आहेत. त्यामध्ये, भाजप नेते नितीन गडकरी व पियुष गोयल हे पुन्हा एकदा मंत्री बनले असून रक्षा खडसे व मुरलीधर मोहोळ यांनाही मंत्रिपदाची संधी मिळाली. रक्षा खडसे दुसऱ्यांदा खसादार बनल्यानंतर त्यांना पहिल्यांदाच मंत्रिपदाची संधी मिळाली आहेत. मात्र, रक्षा खडसेंना मिळालेली मंत्रीपदाची संधी ही घराणेशाही असल्याचं स्वत: राहुल गांधींनी म्हटले आहे. तर, मंत्री पियुष गोयल यांचे वेद प्रकाश गोयल हेही मंत्री राहिले आहेत. कॉंग्रेस हा घराणेशाहीवर चालणारा पक्ष आहे, घराणेशाही जगवायचं काम कॉंग्रेसकडून होते. लांगुलचालन आणि घराणेशाहीवरुन मोदींनी अनेकदा राहुल गांधींना लक्ष्य केले. मात्र, आता भाजपमध्येच कशी घराणेशाही आहे हे राहुल गांधींनी दाखवून दिले आहे. मोदी सरकारमध्ये नव्याने शपथ घेतलेले तब्बल २० मंत्री आहेत, ज्यांना राजकीय वारसा आहे. त्यामध्ये, महाराष्ट्रातील रक्षा खडसे आणि पियुष गोयल यांचेही नाव आहे.

यांची आहे घराणेशाही

एच.डी. कुमारस्वामी, ज्योतिरादित्य शिंदे, किरण रिजेजू, रक्षा खडसे, जयंत चौधरी, चिराग पासवान, जेपी नड्डा, कमलेश पासवान, रामनाथ ठाकूर, राममोहन नायडू, जितीन प्रसादा, शंतनू ठाकूर, राव इंद्रजीत सिंग, पियुष गोयल, किर्ती वर्धन सिंग, विरेंद्रकुमार खाटीक, रवणीनत सिंग बिट्टू, धर्मेंद्र प्रधान, अनुप्रिया पटेल, अन्नपूर्णा देवी

देशात पहिल्यांदाच केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोगाच्या बैठकीस मुख्यमंत्री उपस्थित

आधारभूत किंमत मिळावी, केंद्रीय कृषी मंत्र्यांना देखील भेटणार–मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई । प्रतिनिधी

तिसऱ्यांदा देशाच्या पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी विराजमान झाल्याने शेतकऱ्यांच्या आशा आणि अपेक्षा आणखी उंचावल्या आहेत. राज्यातही शासन शेतकऱ्यांच्या हिताचेच निर्णय घेत आहे, असे सांगून केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोगाच्या माध्यमातून देखील पिकांना चांगली किमान आधारभूत किंमत (एमएसपी) मिळून त्यांना मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली. आज केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोगाच्या बैठकीस उपस्थित राहून एखाद्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी अशा प्रकारे शेतकऱ्यांविषयीची वचनबद्धता प्रकट केल्याबद्दल या बैठकीस उपस्थित विविध राज्यांच्या प्रतिनिधींनी टाळ्या वाजवून प्रशंसाही केली. रब्बी पिकांसाठी किमान आधारभूत किंमत निश्चित करण्यासाठी पश्चिम भारतातील राज्यांच्या प्रतिनिधींची ही बैठक होती.

सह्याद्री अतिथीगृहात आज केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोगाचे अध्यक्ष विजय पाल शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश, गोवा, दीव आणि दमण तसेच महाराष्ट्राच्या प्रतिनिधी व शेतकऱ्यांची बैठक झाली. या बैठकीचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलतांना मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य असल्याचे सांगितले व शेतमालाला चांगली किंमत व बाजारपेठ मिळावी यासाठी पंतप्रधानांसमोर आपलं म्हणणं नुकतचं मांडले असल्याचे ते म्हणाले.

लवकरच केंद्रीय कृषीमंत्र्यांना भेटणार

मुख्यमंत्री म्हणाले की, सोयाबीन, कांदा, कापूस या शेतमालाला चांगली आधारभूत किंमत मिळावी, तसेच शेतकऱ्यांच्या इतर प्रश्नी देखील आपण लवकरच केंद्रीय कृषीमंत्र्यांना भेटणार आहोत. आज मिलेटचा मोठ्या प्रमाणावर प्रसार करण्याचा प्रयत्न राज्य सरकार करीत असून शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळायचे असेल तर मायक्रो मिलेटस्? ला देखील किमान आधारभूत किंमत मिळाली पाहिजे. केंद्र आणि राज्याची विचारधारा एकच असून पंतप्रधान मोदी यांच्यामुळे शेती आणि शेतकऱ्यांना चांगले दिवस येत आहेत. गेल्या दहा वर्षात याची प्रचिती आली आहे. पंतप्रधानपदी शपथ घेतल्यावर नरेंद्र मोदींनी सर्वप्रथम पीएम किसान सन्मान निधीच्या फाईलवर स्वाक्षरी केली आहे. आज राज्य सरकारने देखील शेतकऱ्यांसाठी सर्वाधिक निर्णय घेतले असून गेल्या वर्षभरात नुकसान भरपाईपोटी पंधरा हजार कोटी रुपये दिले आहेत.

पर्यावरणाला पूरक बांबूची लागवड

यावेळी मुख्यमंत्र्यांनी वाढत्या प्रदूषण आणि तापमानावर चिंता व्यक्त केली. ते म्हणाले की, मी स्वत:ही शेतकऱ्याचा मुलगा असून मी वारंवार संबधित तज्ज्ञ व्यक्तींशी यावर बोलत असतो. मी गावी गेलो की, आवर्जून झाडे लावतो. विविध प्रकारची पिके घेतो. गेल्या वर्षभरापासून पर्यावरणाला पूरक अशा बांबू लागवडीला आम्ही मिशन मोडवर सुरुवात केली आहे. आमचे राज्य यामध्ये देशात आघाडीवर असून बांबू लागवडीसाठी सात लाख रुपये हेक्टरी अनुदान शेतकऱ्यांना देण्यात येते. यासाठी दहा लाख हेक्टरचे उद्दिष्टही ठरवण्यात आले आहे. बांबूच्या अनेक प्रजाती असून त्याचे वेगवेगळे फायदे आहेत, त्यामुळे टास्क फोर्सच्या माध्यमातून आम्ही येणाऱ्या काळात पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक ती सर्व पाऊले उचलत आहोत. महाराष्ट्र हे देशाच्या पाच ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्थेमध्ये एक ट्रिलियन डॉलरचे योगदान करण्यासाठी प्रयत्नशील असून यामध्ये शेतीचा देखील मोठा सहभाग असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

प्रतिनिधींकडून स्वागत

केंद्रीय कृषीमूल्य आयोगाच्या बैठकीसाठी खुद्द मुख्यमंत्र्यांनी उपस्थित राहण्याची घटना देशात पहिल्यांदाच घडली असून यामुळे आता या आयोगाच्या ज्या राज्यांमध्ये बैठका होतील तिथे त्या– त्या मुख्यमंत्र्यांनी उपस्थित राहण्याचा पायंडा पडेल, असे राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी सांगताच उपस्थित शेतकरी व प्रतिनिधींनी टाळ्यांचा एकच कडकडाट केला. यावेळी बोलतांना पाशा पटेल यांनी मिलेट उत्पादनासाठी मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली कशा रितीने पुढाकार घेतला ते सांगितले. पर्यावरणासारख्या महत्वाच्या विषयावर मुख्यमंत्री स्वत: टास्क फोर्सचे अध्यक्ष झाले यावरुन राज्य सरकार या विषयी किती गंभीर याची माहिति त्यांनी दिली. यावेळी बोलताना कृषी मंत्री धनंजय मुंडे म्हणाले, विविध राज्ये पिकांची किमान आधारभूत किंमत किती असावी, याच्या शिफारशी केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोगाकडे करतात. मात्र त्यात तफावती आल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होते. त्यामुळे त्यात सुसूत्रता व एकवाक्यता आणणे गरजेचे आहे. यासाठी महाराष्ट्र शासन पुढाकार घेत असून, त्यादृष्टीने आज आयोजित करण्यात आलेली परिषद अत्यंत महत्वाची आहे. सर्वांनी मिळून समन्वयातून विविध पिकांच्या आधारभूत किमतींच्या शिफारशी एकत्रित व समसमान तसेच शेतकऱ्यांचा लाभ विचारात घेऊन केल्याने सर्व संबंधित राज्यांना फायदा होईल, असेही ते म्हणाले. ही परिषद ऐतिहासिक ठरणार असून, रब्बी ज्वारीसाठी किमान आधारभूत किंमत देखील या परिषदेतील चर्चेतून केली जावी व त्यासंबंधीची कार्यवाही व शिफारस देखील शासनाला करावी, अशी सूचनाही धनंजय मुंडे यांनी केली आहे. तसेच ज्वारीच्या धर्तीवर वरई, नाचणी, राळा यांसारख्या आदिवासी क्षेत्रात घेतल्या जाणाऱ्या पौष्टिक तृण धान्यासाठी देखील किमान आधारभूत किंमत लागू करण्याबाबत विचार व्हावा, अशीही सूचना श्री. मुंडे यांनी केली आहे. केंद्रीय कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष विजय पाल शर्मा म्हणाले, आयोग शेती व शेतकरी हितासाठीच काम करेल. शेतमालाला योग्य मोबदला मिळेल तसेच कृषी मालाची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल. कृषी विस्तार यंत्रणा मजबूत करणे, खतांचा वापर कमी करणे, कृषी यांत्रिकीकरणावर भर देणे, खरीपामधील पिकांना देखील एमएसपीचा फायदा मिळवून देणे, खाजगी क्षेत्राची भागिदारी व गुंतवणूक वाढविणे यादृष्टीने आयोग काम करत असल्याचे सांगितले. राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल म्हणाले, कृषी क्षेत्राला महत्त्व देणारे हे सरकार आहे. त्यामुळेच कृषी मूल्य आयोगाच्या इतिहासात पहिल्यांदाच असं घडत आहे की कृषी मूल्य आयोगाच्या किंमत विषयक धोरण ठरविण्याबाबतच्या बैठकीस राज्याचे मुख्यमंत्री आणि कृषी मंत्री उपस्थित राहिले आहेत. तृणधान्याचे महत्व लक्षात घेऊन २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षे म्हणून साजरे केले आहे. तसेच तापमान वाढ कमी करण्यासाठी राज्यात मोठ्या प्रमाणात बांबू लागवड करण्यात येत आहे.राज्यातील शेतकऱ्यांना चांगले दिवस येण्यासाठी कृषी मूल्य आयोगाची भूमिका सकारात्मक राहील, असेही श्री. पटेल यावेळी म्हणाले. केंद्रीय कृषी मूल्य आयोग – रब्बी हंगाम २०२५–२६ केंद्रीय कृषी आयोगाची किंमत विषयक धोरण ठरविण्याबाबत बैठक सह्याद्री अतिथी गृह येथे आयोजित केली होती. यावेळी कृषी मंत्री धनंजय मुंडे, आमदार भरत गोगावले, केंद्रीय कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष विजय पॉल शर्मा, राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) चे प्रकल्प संचालक परिमल सिंह तसेच केंद्र आणि राज्य कृषी मुल्य आयोगाचे सदस्य आणि पश्चिम भारत समूहातील महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान,मध्य प्रदेश, गोवा व दमण राज्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. केंद्रीय कृषी मूल्य आयोगाकडून विविध पिकांच्या किमान आधारभूत किमतींची शिफारस केंद्र शासनाला करण्यात येते आणि केंद्र शासन राष्ट्रीय स्तरावर आधारभूत किंमत योजनेत समाविष्ट शेतमालाच्या आधारभूत किंमती निश्चित करून जाहीर करते. केंद्र शासनाने जाहीर केलेल्या किंमती सर्व राज्यांना लागू होतात.

पान १वरून...

पिककर्ज वाटपात

तर ग्रामीण बँकेने १३१ कोटी ९१ लाख एवढे पीक कर्ज वाटप केले असून त्यांची टक्केवारी २९.१८% एवढी आहे. जिल्ह्यात एकूण ३२२ कोटी ७० लाख रुपयांचे पीक कर्ज वाटप झाला आहे. तर वाटपाची एकूण टक्केवारी १८.९१% एवढी आहे. सेंट्रल बँक ऑफ इंडिया, डीसीबी बँक, कोटक महिंद्रा बँक, आणि आर.बी.एल. बँक या चार बँकांना केवळ आठ कोटी रुपयांचे उद्दिष्ट देण्यात आलं होतं. पण त्यांनी एक रुपयाचे देखील वाटप केलेले नाही. स्टेट बँक ऑफ इंडिया ला ३९१ कोटींचं वाटप दिले असताना केवळ १२५ कोटी रुपयांचे वाटप झाले आहे. महाराष्ट्र ग्रामीण बँकेने ४५२ कोटी रुपयांच्या उद्दिष्टांपैकी केवळ १३१ कोटी रुपयांचे वाटप केले आहे. तर बँक ऑफ बडोदा ने ६५ कोटी रुपयांचे उद्दिष्ट असताना केवळ १७ कोटी वाटप केले आहे. कॅनरा बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, एच.डी.एफ.सी. बँक, युनियन बँक ऑफ इंडिया, युको बँक, आय.सी.आय.सी.आय. बँक, बँक ऑफ इंडिया, ॲक्सिस बँक, आय.डी.बी.आय. बँक, पंजाब नॅशनल बँक, या बँकांनी वाटप केलेली रक्कम पाहता ती १६ लाख ते सहा कोटीच्या आत आहे. त्यामुळे ही प्रचंड उदासीनता आहे. पिक कर्ज वाटपातील ही उदासीनता आहे. पीक कर्ज वाटताना अनेक अडथळ्यांना तोंड द्यावे लागते, ही बाब मान्य असली तरी एवढी उदासीनता का ? हा प्रश्न उपस्थित होत आहे. शेतकऱ्यांना पीक कर्ज वेळेत दिले नाही, तर पेरणी कशी करणार ? हा प्रश्नही उपस्थित होत आहे.

महायुतीसाठी धक्का;

निवडणुकीत महाराष्ट्रात सत्ता परिवर्तन होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रात विधानसभेच्या एकूण २८८ जागा आहेत. महाराष्ट्रात सत्ता स्थापन करण्यासाठी महाविकास आघाडी किंवा महायुतीला १५५ जागांवर विजय मिळवावा लागणार आहे.

विनोद तावडे

आहे. विनोद तावडे हे पक्षाच्या सरचिटणीस पदापासून काम करत आहेत. त्यांच्यावर जी जबाबदारी आजपर्यंत दिली, ती त्यांनी यशस्वीपणे पूर्ण केली आहे. त्यामुळे त्यांना पक्षात आता मोठी संधी दिली जाऊ शकते. ती संधी सुद्धा ते यशस्वीपणे पार पाडतील असे चंद्रकांत पाटील म्हणाले. ती जबाबदारी कोणती असेल? यासंदर्भात चंद्रकांत पाटील यांनी अधिक काही माहिति दिली नाही. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विनोद तावडे महाराष्ट्राच्या राजकारणात कमबॅक करणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. लोकसभा निवडणुकीत मिळालेले अपयश पाहता विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर राज्यात भाजप खांदेपालट करु शकते, असे म्हटले जात आहे.

लोकसभेतील यशानंतर उध्दव ठाकरेंकडून

मांडला व या निवडणुकीत बीड जिल्हा शिवसेनेने महत्त्वाची भूमिका बजावली असल्याचे सांगितले. यापुढे बीड जिल्ह्यातील शिवसेना सर्व मतदारसंघात आपली ताकद निर्माण करेल व सर्वची सर्व जागा लढविण्यासाठी युव्हरचना करेल व महाविकास आघाडी कायम राहील्यास जिल्ह्यातील जास्तीत जास्त जागा महाविकास आघाडीच्या निवडून आणण्यासाठी प्रयत्नशील राहील असे सांगितले. याप्रसंगी शिवसेनेचे सचिव अनिल देसाई हे नवनिर्वाचित खासदार झाले म्हणून परमेश्वर सातपुते यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी आदित्य ठाकरे, खा. संजय राऊत, दिवाकर रावते, विनायक राऊत, मिर्लेकर, नेरुळकर, वरूण सरदेसाई आदि उपस्थित होते.

बजरंग बप्पांचा अजित

संपर्कात असल्याचे नमूद केले आहे. अमोल मिटकरींच्या ट्वीटनंतर राजकीय वर्तुळात अनेकांच्या भुवया उंचवल्या आहे. फोन केला पण तो राजकीय नव्हता असेच या प्रकारात खा. सोनवणे यांना बहुतेक म्हणायचे असावे. अमोल मिटकरी म्हणाले, एक तर गळाला लागल्यासारखा दिसतोय, बोलतोय लवकर मोठा पिक्चर तुम्हाला दिसेल. अजित पवार हे राज्याच्या केंद्रस्थानी महत्त्वाची व्यक्ती आहे, हे सिद्ध होत आहे. एखाद्याच्या साखर कारखान्याच्या मजुराचा प्रश्न असेल आणि तो व्यक्ती दुसऱ्या गटाचा खासदार असेल आणि तो दादांना विनंती करत असेल तर माझ्या सारख्या राष्ट्रवादीच्या आमदाराला ही भूषणावाह बाब आहे. आज तुम्ही ट्रेलर पाहिला आता विरोधकाकडून स्पष्टीकरण साहजीक आहे. आता आम्ही पण वाट पाहतो की, ते काय स्पष्टीकरण देतात. आमचे चुकीचे असेल संबंधित नेत्यांते कॉल डिटेल्स काढा तुम्हाला कळेल. दुपारी देखील फोन येऊन गेल्याची माहिति आहे. विधानसभा निवडणुकीच्यापूर्वी तुम्ही बघा आगे, आगे देखो होता है क्या? असेही मिटकरी म्हणाले.

सोन्याच्या दरात घसरण

सध्या देशांतर्गत बाजारात प्रति १० ग्रॅमचा सोन्याचा भाव हा ७१ हजार रुपयांच्या खाली गेला आहे. चीनने सोन्याची खरेदी थांबवल्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर सोन्याचे भाव पडले आहेत. त्याचा परिणाम भारतात जाणवला आहे.

आषाढी वारीसाठी यंदा एसटी

संपर्क साधावा असे आवाहन एसटी महामंडळातर्फे करण्यात आले आहे. सालाबाद प्रमाणे श्री श्रेत्र पंढरपुर येथे आषाढी एकादशीला राज्यभरातून लाखो भाविक–प्रवाशी येतात. अनेक प्रवाशी स्वत:च्या खाजगी वाहनाने, रेल्वेने, एसटीने अथवा विविध पालखीं बरोबर चालत दिंडीने येतात या प्रवाशांना एसटीने यंदापासून थेट गाव ते पंढरपूर अशी बस सेवा उपलब्ध करून दिली आहे. ४० पेक्षा जास्त भाविक प्रवाशांची संख्या असल्यास त्यांना त्यांच्या गावापासून विशेष बस उपलब्ध करून दिली जाणार आहे. अर्थात या प्रवासात देखील ७५ वर्षावरील ज्येष्ठांना मोफत प्रवास देणारी अमृत ज्येष्ठ नागरिक योजना, महिलांसाठी ५० टक्के तिकीट दरात सुट देणारी महिला सन्मान योजना यासारख्या शासनाने दिलेल्या सर्व सवलती लागू राहणार आहेत. दरम्यान, मागील वर्षी एसटीने आषाढी यात्रे निमित्त ४२४५ विशेष बसेस सोडल्या होत्या. याव्दारे यात्रा काळामध्ये १८ लाख, ३० हजार, ९३४ भाविक प्रवाशांची सुखरूप ने–आन एसटीने केली होती.

दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

सरस बियाणांचा काळा बाजार, तरीही अधिकारी शांत का? -आमटे

बीड । प्रतिनिधी

शेतकऱ्यांना बी बियाणे उपलब्ध करून देणे हे प्रशासन व अधिकारी यांचं काम आहे. तरी आज बीड मध्ये कापूस बियाणांचा सरस काळा बाजार सुरू असताना बीड जिल्हा प्रशासन कृषी विभाग शांत का? बीड जिल्हा मध्ये ॲग्रो सीड कंपनी चे ७०६७ व तुलासी कंपनीचे कब्बडी या बियाणांची साठेबाजी करून कृत्रिम टंचाई निर्माण केली ८६४ रुपयची बॅग हि जास्तीच्या चढ्या भावाने विक्री केली तरीही बीड जिल्हा कृषी विभागा शांत का? शेतकरी पेरणीच्या दिवसात मजबूर असतो प्रत्येकाला वाटत की आपल्याला चागल्या कंपनीचे बियाणे मिळावे या मजबुरीचा फायदा लालची व्यापारी करतात आपले कृषी विभाग मूग गिळून गप्प का? शेतकऱ्यांच्या मजबूरीचा फायदा घेणाऱ्या लालची कंपनी डीलर कृषी दुकानदार यांच्यावर कडाक कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी शिवसंग्राम शेतकरी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, सुनील कुटे, राजू सय्यद, रमेश जगताप, कृष्णा मसुरे, लाटे तात्यासाहेब, मोहन गव्हाणे, संजय तीपाले, विलास मस्के, शैलेश सूरवसे, सचिन आमटे, आदीच्या वतीने मागणी करण्यात येते.

खताच्या एका गोणीसाठी शेतकऱ्यांना पुन्हा रांगेत उभे करणार का? - किसान सभेचा सवाल

बीड । प्रतिनिधी

चालु खरीप हंगामात राज्यातील शेतकऱ्यांना ३८ लाख टन खताची आवश्यकता आहे. पैकी सध्या केवळ ३१.५४ लाख टन इतकाच खतसाठा उपलब्ध आहे. उपलब्धता पाहता शेतकऱ्यांना यंदाही एका एका गोणीसाठी रांगेत उभे राहण्याची वेळ येईल, याकडे किसान सभेचे डॉ. अशोक ढवळे, जे. पी. गावीत, उमेश देशमुख आणि डॉ. अजित नवले यांनी सरकारचे लक्ष वेधले आहे.

यासंदर्भात काढलेल्या निवेदनात किसान सभेने नमूद केले आहे की, दुबार पेरणीचे संकट आले तर ही परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते. खताची वाढीव दराने विक्री केल्यास, बोगस खते विकल्यास किंवा खतांचे लिंकिंग केल्यास कारवाईचे इशारे दिले गेले आहेत. मात्र असे इशारे अनेकदा 'अर्थ'पूर्ण व्यवहारांसाठीच असल्याचे अनुभव आहेत. शेतकऱ्यांना अल्प व्याजदराने पुरेसे कर्ज व नैसर्गिक आपत्तीमध्ये 'खरेखुरे' पीक विमा संरक्षण उपलब्ध असणे आवश्यक आहे.

यासंदर्भात किसान सभेने नमूद केले आहे की, खरीपाची तयारी करण्याची मुख्य जबाबदारी कृषी विभागाची असते. राज्याचे कृषी मंत्री, कृषी सचिव व कृषी आयुक्तांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण कृषी विभागाने खरीप हंगामाला सामोरे जाण्यासाठी अत्यंत कुशलतेने नियोजन करणे अपेक्षित असते.

राज्याच्या एकूण १६६.५० लाख हेक्टर पेरणी क्षेत्रापैकी १५१ लाख हेक्टर क्षेत्रावर खरिपाची पेरणी होत असते. यंदाच्या खरीप हंगामात १४७.७७ लाख हेक्टरवर खरिपाची पेरणी होण्याचा अंदाज आहे. सोयाबीनची राज्यात ५०.७० लाख हेक्टरवर पेरणी होणे अपेक्षित आहे. शिवाय कापूस ४०, भात १५.९१, मका ९.८०, ज्वारी २.१५, बाजरी ४.९५, तूर १२, मूग ३.५, उडीद ३.५, भुईमुग २.५ तर इतर पिकांची २.६ लाख हेक्टरवर पेरणी होण्याचा अंदाज आहे. इतकी पेरणी व्हावी यासाठी राज्याला किमान १९.२८ लाख क्विंटल बियाणांची आवश्यकता आहे.

सध्या महाबीजकडून ३.७६ लाख क्विंटल, राष्ट्रीय बीज निगमकडून ०.५९ लाख क्विंटल आणि खासगी बियाणे कंपन्यांकडून २०.६५ लाख क्विंटल बियाणे उपलब्ध होणे अपेक्षित आहे. एकूण बियाण्याच्या गरजेपैकी यानुसार राज्याला तब्बल सुमारे ८० टक्के बियाण्यासाठी खासगी कंपन्यांवर अवलंबून राहावे लागत आहे. बियाण्यांच्या गुणवत्तेचे अनेक गंभीर प्रश्न यामुळे निर्माण होत आहेत. राज्यात सध्या आवश्यक बियाण्याच्या तुलनेत केवळ ३१ टक्के इतकेच अधिकचे बियाणे उपलब्ध आहे. दुबार पेरणीच्या संकटाचा सामना करण्यासाठी यापेक्षा खूप अधिक बियाणे हाताशी ठेवण्याची आवश्यकता आहे

राज्यात मान्सून सक्रिय झाला असताना राज्य सरकार व राज्याचा कृषी विभाग अजूनही खरीप तयारीबाबत निष्क्रियता सोडताना दिसत नाही. खरीपाची जशी शेतकरी प्राधान्याने तयारी करतात तशीच तयारी शासन-प्रशासनाच्या वतीनेही होणे अपेक्षित असते. राज्यभर तालुका, जिल्हा व राज्य पातळीवर लोकप्रतिनिधी, महसूल व कृषी विभागाचे अधिकारी यांच्या खरीप नियोजन बैठकांमध्ये खते, बियाणे, कीटकनाशके, कर्ज, पीक विमा, पर्जन्यमान, जलसाठ्यांची स्थिती, वीज पुरवठा, रस्त्यांची दुरुस्ती, गोदामे, बाजार सुविधा अशा संबंधित सर्व बाबींचे गांभीर्याने नियोजन होणे अपेक्षित असते. निवडणुकांच्या माहोलमधून राज्यकर्ते अजूनही बाहेर यायला तयार नसल्याने याबाबत केवळ कागदी घोडे नाचविले गेले आहेत. खरीप हंगामच त्यामुळे धोक्यात आला आहे, अशी टीका किसान सभेचे डॉ. अशोक ढवळे, जे. पी. गावीत, उमेश देशमुख आणि डॉ. अजित नवले यांनी केली आहे.

दुर्दैवाने राज्याच्या विस्कटलेल्या राजकीय परिस्थितीमुळे कृषी विभागाची राज्यात अक्षरशः दैना झाली आहे. कृषी आयुक्त, कृषी सचिव व कृषी विभागातील विविध अधिकाऱ्यांच्या सातत्याने बदल्या होत आहेत. अनेक पदे रिक्त आहेत. विभागातील बहुतांश सर्वोच्च पदांवर 'प्रभारी' अधिकारी कार्यरत आहेत. प्रभारी चार्ज असल्याने हे अधिकारी खरीप नियोजनासाठी गंभीर नाहीत. राज्याचे मुख्यमंत्री, कृषिमंत्री व इतरही संबंधित मंत्री राजकारणात मश्गुल आहेत. राज्याचा कृषी विभाग यामुळे गलितगात्र झाला आहे. अशा या सर्व परिस्थितीत सरकारने आता निवडणुकीतून बाहेर येऊन हे सर्व प्रश्न गांभीर्याने घ्यावेत अशी मागणी किसान सभा करत आहे.

खा. बजरंग सोनवणेंनी अडचणी जाणून घेत प्रत्यक्ष कामाला सुरुवात

पवनसुत निवासस्थानी नागरिकांनी केली गर्दी

केज । प्रतिनिधी

आठवडाभरानंतर खासदार बजरंग सोनवणे हे जिल्ह्यात दाखल होताच त्यांच्या केज येथील पवनसुत नागरिकांनी प्रचंड गर्दी केली. तर त्यांनी नागरिकांच्या अडचणी जाणून घेत प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली आहे. त्यामुळे प्रचारात त्यांनी एक खासदार काय असतो ? हे दाखवून देऊ अशी ग्वाही दिली. त्याची प्रचिती यावरून दिसून येत आहे.

बीड जिल्ह्याचा खासदार म्हणून निवडून आल्यानंतर बजरंग सोनवणे यांनी दुसऱ्या दिवशी पक्षाचे अध्यक्ष जाणते राजे खा. शरदचंद्र पवार यांची भेट घेतली. त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ते मुंबई येथे गेले होते. त्यानंतर ते वरिष्ठांच्या आदेशानुसार मुंबई येथेच होते. सोमवारी पक्षाच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने अहिल्यानगर येथे आयोजित कार्यक्रमाला त्यांची मुख्य उपस्थिती होती. यावेळी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आपला फेटा बजरंग सोनवणे यांना घालत जायंट किलर असा उल्लेखही केला. तर बजरंग सोनवणे यांनी आपल्या भाषणात आपण आगामी विधानसभेसाठी मराठवाड्यात मोठी मोर्चेबांधणी करू व यश मिळवून देऊ असा विश्वास व्यक्त केला.

आठवडाभरानंतर खा. बजरंग सोनवणे हे केजमध्ये पोहचले. मंगळवारी सकाळपासूनच त्यांच्या पवनसुत या निवासस्थानी नागरिकांची प्रचंड गर्दी जमली होती. ॲक्शन मोडवर असलेल्या सोनवणेंनी आलेल्या नागरिकांनी अडचणी ऐकून घेत त्या सोडवण्यासाठी अनेक अधिकारी वर्गाना फोन करीत त्या समस्या सोडवण्याच्या सूचनाही केल्या. आपली अडचण समजून घेत प्रशासकीय अधिकाऱ्यांशी बाप्पानी संपर्क केल्यामुळे नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होते.

भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या वतीने पुनंदगाव येथे वृक्षारोपणाचे आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील पुनंदगाव याठिकाणी भ्रष्टाचार निर्मुलन समितीच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात येणार आहे २० जून २०२४ रोजी वृक्षारोपण करण्यात येणार आहे असे भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे जिल्हाध्यक्ष परमेश्वर सोळंके यांनी पत्रकात म्हटले आहे भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या २६ वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन बीड जिल्ह्यात ठेवण्यात आलेले आहे तर माजलगाव मध्ये पुनंदगाव या ठिकाणी वृक्षारोपण करण्याचे ठरवले आहे असे पत्र काढण्यात आलेले आहे यावेळी तेथील उपसरपंच ग्रामसेवक आणि समितीचे तालुका अध्यक्ष सिद्धेश्वर गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थित वृक्षारोपण करण्याचे आयोजन केलेले आहे.

भ्रष्टाचार निर्मुलन समितीच्या २६ व्या वर्धापन दिनानिमित्त समितीच्या वतीने वृक्षारोपण तालुक्यातील पुनंदगाव याठिकाणी आयोजित करण्यात आला आहे.

येथील उपसरपंच यांनी मोठा पुढाकार घेऊन आमच्या गावामध्ये सामाजिक कार्यक्रम राबवण्यात येतात व ते राबवली गेली पाहिजे असे म्हटले आहे गाव हे धरण परिसर असल्यामुळे या परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्षाची लागवड होण्यासाठी ग्रामपंचायत सदैव सामाजिक संघटनेच्या पाठीमागे राहील असे मत व्यक्त केले आहे.

बीड शहरासह ग्रामीण भागामध्ये दोन हजार झाडे लावून संगोपन करण्याचा संकल्प

छत्रपती संभाजी महाराज मल्टी योगा ग्रुप व योगा फिट बडडीस ग्रुपचा पुढाकार

बीड । प्रतिनिधी

शहरातील जिव्हाळा बेघर केंद्र या ठिकाणी योगा ग्रुपचे सदस्य राष्ट्रपती पदक मानकरी राजाभाऊ गुळभिले,नितीन भैय्या धांडे,मिलिंद ओव्हाळ,मनोज डरफे, विठ्ठल वीर,पंडित आगम,अनिल तापडिया, गायकवाड साहेब. देवकरसर,पोपळेसाहेब,गजानन शिंदे,डॉ. उजेगर सर,अमोल घोलप, राजू वंजारी, वैद्य साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये प्राथमिक स्वरूपात झाडाचे वृक्षारोपण करण्यात आले यावेळी ''एक व्यक्ती एक झाड संगोपन''असा संकल्प व संदेश देण्यात आला बीड शहरातील व ग्रामीण भागातील नागरिकांना झाडे लावून संगोपन करण्यासाठी इच्छुक असतील त्या नागरिकांनी ७३८५४१०१०९ व ९४२२२४००८८ या दिलेल्या नंबर वर संपर्क साधावा त्या नागरिकांना झाडे उपलब्ध करून दिली जातील असे आवाहन करण्यात आले आहे की यावेळी बीड शहरातील योगा ग्रुपच्या सदस्यांसह प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

धारूर घाट रुंदीकरणाबाबत धारूर प्रशासनाने भूमिका दोन दिवसात लोकांसमोर मांडावी -डॉ.जितेंद्र ओव्हाळ

महाराष्ट्र शासन
तहसिलदार
तथा
तालुका कार्यकारी दंडाधिकारी
किल्ले धारूर

बेमुदत रस्तारोकोचा दिला इशारा

किल्लेधारूर । प्रतिनिधी

धारूर च्या घाटामध्ये होणारे अपघात थांबायला तयार नाहीत या प्रश्नाकडे प्रशासनाने गांभीर्याने घ्यावे व दोन दिवसांमध्ये याबाबतची आपली भूमिका लोकांसमोर मांडवी असे निवेदन तहसीलदार यांना दिले आहे स्पष्ट न केल्यास बेमुदत रस्ता रोको करण्याचा इशारा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विकास मंच चे अध्यक्ष जितेंद्र ओव्हाळ यांनी दिला आहे.

दिवसापाटोपाट धारूर घाटात अपघात होत असताना लोकप्रतिनिधी आमदार जायमोख्याावर जाऊन निर्णय घेत नसल्याने बिनकामा च्या लोकप्रतिनिधींचा जाहीर निषेध केला आहे डॉ.बाबासाहेब आंबेडकर विकास मंच अध्यक्ष डॉ जितेंद्र ओव्हाळ यांनी सोमवारी धारूर येथे केला.

तहसीलदार कांबळे साहेब यांना निवेदन देऊन धारूर घाट रुंदीकरण बाबत येत्या दोन दिवसात भूमिका लोकांसमोर सांगा आशी मागणी करत धारूर घाट रुंदीकरण करा.व इतर अनेक मागण्यासाठी घाटात विराट रस्तारोको अंदोलन करण्याचा इशारा डॉ बाबासाहेब आंबेडकर विकास मंच महाराष्ट्र प्रमुख डॉ जितेंद्र ओव्हाळ यांनी सोमवारी दिला या वेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर विकास मंच जिल्हाअध्यक्ष प्रशांत ओव्हाळ तालुका अध्यक्ष सनी गायसमुद्रे सचिन साळवे अमोल सिरसठ तुषार भालेराव महेश सिरसठ श्रीपती वाव्हाळ दीपक वाव्हाळ महादेव वाघमारे अविनाश घायाळ सह कार्यकर्ते उपस्थित होते.

ॲड.शेख शफिक यांच्या नेतृत्वाखाली आंदोलनाचा इशारा देताच रस्त्याच्या कामाला सुरुवात

बीड । प्रतिनिधी

अडत मार्केट समोरिल रोडची अवस्था बिकट स्वरूपाची झालेली होती येथील नागरिकांना मोठ्या प्रमाणावर नाहक त्रास सहन करावा लागत होता यामुळे येथील रहिवाशी यांनी ॲड.शेख शफिक भाऊ यांच्या नेतृत्वाखाली नगरपरिषद प्रशासनाला आंदोलनाचा इशारा देताच रोडच्या कामाला सुरुवात झाली असून काही दिवसापूर्वी मुख्य अधिकारी यांनी ॲड.शेख शफीक भाऊ ,शेख सलमान आणि एमआयएमचे पदाधिकारी यांना बोलून अधिकृत पत्र देऊन आंदोलन न करण्याचे सूचना देऊन काही दिवसातच आम्ही अडत मार्केट समोरील रस्त्याच्या कामाला सुरुवात करणार आहोत असे लेखी आश्वासन दिले होते. त्यानुसार आज प्रत्यक्षात कामाला सुरुवात झाली असून येथील नागरिकांनी एम आय एम च्या सर्व पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.

बीड शहरातील काकू नाना अडत मार्केट समोरील रोडची अवस्था खूप बिकट झाली होती या रोडवरून पायी चालणाऱ्या लोकांना नीट चालता येत नव्हता, या रोडवर धुळीचे साम्राज्य पसरलेले होते, पावसाळ्यात या रोडला जणू तलावाचे स्वरूपच मिळत होते,बाहेरगावावरून अडत मार्केटमध्ये माळवा घेऊन येणाऱ्या शेतकऱ्यांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत होता, तसेच या रोडवरून शाळेत जाणाऱ्या मुलांना देखील मोठ्या प्रमाणावर त्रास होत होता, या रोडवर महिलांचा वावर जास्त आहे,तसेच खासबाग देवी मंदिराला जाणाऱ्या लोकांना पण या रोडवरून आपला मार्ग काढून चालावा लागत होता, याचीच दखल घेत गेल्या पाच महिन्यापासून एमआयएमच्या वतीने पाठपुरावा चालू होता.मुख्याधिकारी यांना अनेक वेळा निवेदन दिले.

तहसिल कार्यालय बीड
(संकिर्ण विभाग)
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार बीड यांच्या न्यायालयात
सुनावणी नोटीस
क्र.२०२४/संकिर्ण/जन्म-मृत्यू नोंद / कावी-९३२
दि.१०/०६/२०२४
प्रति,
ग्रामविकास अधिकारी/ ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय, अव्वलपुर/ सोनगाव, ता.बीड
विषय :- जन्म-मृत्यू नोंद प्रस्ताव दाखल केल्याबाबत.
केशरबाई भानुदास उमाप
संदर्भ :- १. भारत राजपत्र सी.जी.डी.एल.अ. (१२०८२०२३-२४८०४४ नवी दिल्ली शुक्रवार ऑगष्ट ११,२०२३ श्रावण शके २०.१९.४५ (शक) विधी व न्याय मंत्रालय (कायदा विभाग) यांचेकडील शासन आदेश निर्देश
परिपत्रक व व्याप्ती निर्देशान्वये या न्यायालयात प्रकरण चालविण्याचा अधिकार आहे.
२. मा. जिल्हाधिकारी बीड यांचे आदेश क्र.२०२३/आरबी-डेस्क-१/पोल-१/जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-२०२३ दिनांक १३.१०.२०२३
उपरोक्त विषयी या न्यायालयात श्री श्रीम अधिवक्ता/ॲड.एम.आर.उबाळे यांनी वकीलपत्रासह अर्जदार केशरबाई भानुदास उमाप रा.अव्वलपूर/सोनगाव ता.जि.बीड यांचे वतीने विषयासंदर्भात प्रस्ताव दाखल केला आहे.
याद्वारे थोडक्यात असे की, श्री/श्रीम. केशरबाई भानुदास उमाप यांची आपले कार्यालयाचे दप्तरी जन्माची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये अनुपलब्ध असलेबाबत आपले कार्यालयातुन दिनांक ६/०५/२०२४ रोजी प्रमाणपत्र दिले आहे.
त्याअनुषंगाने आपलेमार्फत हे जाहिरप्रगटन प्रसिध्द करुन सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यांनी श्री/श्रीम केशरबाई भानुदास उमाप यांचे दिनांक १७/११/२०२४ रोजीची जन्माची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीमध्ये घेण्याबाबत कोणाचर्ची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु जन्म नोंद दिनांक १७/११/२०२४ घेण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.
सदरील नोटीस आपले कार्यालयाचे नोटीस बोर्डवर डकवून पंचनामा प्रत या कार्यालयास सादर करावी.
आज दिनांक १०/०६/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १०/०७/२०२४ ही आहे.
तहसिलदार, बीड.

बीडच्या मुलांनी राज्यस्तरीय रग्बी स्पर्धेत मिळवले रौप्य पदक

11th MAHARASHTRA STATE RUGBY CHAMPIONSHIP
Shree Shiv Chhatrapati Sports Complex, Pune
Venky's
RAM
FinIQ
METTA SOCIAL
Fitness Friends

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र रग्बी असोसिएशन यांच्या मान्यतेने आणि पुणे रग्बी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ११ वी राज्यस्तरीय रग्बी स्पर्धा दिनांक ८ ते ९ जून दरम्यान श्री शिछत्रपती क्रिडापीठ महळुंगे - बालेवाडी पुणे येथे संपन्न झाली. महाराष्ट्रभरातून २१ संघ या स्पर्धेत सहभागी झाले होते. बीड जिल्हाचा १७ वर्षाखालील वयोगटात मुलांचा व मुलींचा संघ या स्पर्धेत संघ सहभागी झाले होते.या पैकी मुलांच्या संघाने

पहिला सामना, सांगली ०० गुण विरुद्ध बीड २२ गुण असा जिंकला , नांदेड ०० गुण विरुद्ध बीड ४८ गुण दुसरा सामना असा जिंकला, उप उपांत्य रत्नागिरी संघ ०७ गुण विरुद्ध बीड संघ २७ गुण, उपांत्य फेरीत बलाढ्य असा ठाणे संघाबरोबर ०५ २७ गुण असा सामना एकतर्फी जिंकून बीड संघाने अंतिम फेरीत दिमाखात प्रवेश केला. सुवर्ण पडकासाठी अंतिम सामना पारंपरिक कोल्हापूर सारख्या बलाढ्य संघाबरोबर झाला. यामध्ये शेवटच्या क्षणापर्यंत बीड संघाने अत्यंत उत्कृष्ट खेळ करत,बरोबर चुरशीची लढत दिली,

परंतु या सामन्यात निसटता पराभव झाल्यामुळे बीड संघाला रौप्य पदकावरती समाधान मानावे लागले.

या स्पर्धेसाठी १७ वर्ष मुले संघ पुढील प्रमाणे संदीप राजेश वाडमारे (कर्णधार),वेदांत गोरख डावकर, ऋषभ बापू शिंदे, आदित्य ऋषिकांत तांदळे, प्रतीक प्रल्हाद शिंगटे ,सार्थक कुमार पवार, सुमित रघुनाथ मुंडे,यश रवींद्र सूर्यवंशी, पवन सोमिनाथ मस्कर, सार्थक बाबू भुसारी, मनोज दत्तात्रय चौधरी, ओमकार महादेव येळवे, खांडे आकाश भास्कर या खेळाडूंचा समावेश होता.या संघास रग्बी असोसिएशन ऑफ महाराष्ट्र चे नासेर शेख, मिनाल पास्तला, कु.वाहाबिज भरोचा, विश्वास कोटकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री नितीन येळवे यांच्या हस्ते रौप्य पदक देऊन सन्मानित करण्यात आले. या संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून श्री नितीन येळवे, व्यवस्थापक श्री शोयब खाटीक श्री अशोक चौरे यांनी उत्कृष्ट कामगिरी पार पडली आहे. राज्य स्पर्धेसाठी बीड जिल्ह्यातील संभाजी गिरे आणि विशाल ढास यांनी प्रथमच पंच/तांत्रिक अधिकारी म्हणून उत्तम कामगिरी पार पडली आहे.

विजयी संघाचे अभिनंदन बीड जिल्हा रग्बी असोसिएशन अध्यक्ष इसाक शेख , कोषाध्यक्ष हरिभाऊ बांगर , उपाध्यक्ष रमेश सानप, सचिव महेश घुले, कार्याध्यक्ष नितीन येळवे , क्रीडा अधिकारी पंडित चव्हाण साहेब, योगेश करांडे, जितू अराक सर, आंतरराष्ट्रीय खेळाडू यश जाधव ,राष्ट्रीय खेळाडू सुरज येवले, सुरज येडे ,ओमकार मोरे, ईश्वर कानडे , राज्यस्तरीय खेळाडू अनिकेत नागरे, आदनान शेख , अतुल मुळूक,अजिंक्य बांगर यांच्यासह बीड जिल्हा रग्बी असोसिएशनचे सर्व पदाधिकारी, तसेच मोरया क्रीडा मंडळ बीड चे सर्व पदाधिकारी, क्रीडा प्रेमी,खेळाडू यांनी केले आहे.

पान ६ वरून...

कापूस लागवड तंत्रज्ञान

त्याच भावाने बियाणे खरेदी करण्याचे आवाहन केले.आणि शेतकऱ्यांनी कोणत्याही एकाच वाणाच्या मागे न लागता आपल्या जमिनीच्या गुणधर्मानुसार बियाणे निवडून व बीज प्रक्रिया करून कापूस बियाणाची लागवड करावी असे सांगितले.तसेच माती परीक्षणानुसार जमिनीला खते द्यावीत जेणेकरून रासायनिक खतामध्ये समतोल राहील व आपली जमीन ही सुपीक होईल.तसेच उपलब्ध असल्यास शेणखत कुजलेला काडीकचरा हा शेतामध्ये टाकल्यास आपल्या कपाशी पिकामध्ये वाढ होईल असे सांगितले.आणि कापूस बियाणे बॅग मधले जरी असेल तरी त्याला जैविक बीज प्रक्रिया करून लागवड केल्यास आपल्या कापूस पिकातील मर थांबवता येते आणि पिकाची चांगल्या प्रकारे वाढ होते.या कार्यक्रमाला ५० हून अधिक शेतकरी जीवन पद्धतीने जोडल्या गेले होते. या कार्यक्रमाचे आयोजन रिलायन्स फाउंडेशनचे कार्यक्रम सहाय्यक विजय खंडागळे आणि जिल्हा व्यवस्थापक तज्जोदिन काजी यांनी केले होते.

कृषी कन्यांनी शेतकऱ्यांना

कृषी कन्या खोड प्रतीक्षा, गवळी संध्या, पवार ज्योती, करांडे रूपाली, पाटील यशस्वी, खोले निकिता उपस्थित होत्या. ग्रामीण जागरूकता कार्यक्रम कार्यानुभव कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी अनंत कृषी विकास प्रतिष्ठानचे सहसचिव डॉ.जी.व्ही. साळुंखे यांचे मार्गदर्शन लाभत आहे तसेच प्राचार्य एस.पी. मोरे, प्रा.व्ही.जी. तायडे, एस.एस. राठोड, पी.ए. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
बुधवार दि.१२ जून २०२४

कांदा शेतकऱ्यांना हसवणार, ग्राहकांना रडवणार

कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. कांद्याच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे. त्यामुळं दरातही वाढ झाली आहे. याचा फायदा कांदा उत्पादक शेतकऱ्यांना होत आहे. तर दुसरीकडं दरात वाढ झाल्यामुळं ग्राहकांना फटक बसत आहे. बकरी ईदचा सण जवळ आला आहे. त्यापूर्वी कांद्याच्या मागणीत वाढ झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

सध्या कांद्याच्या दरात चांगलीच वाढ होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. गेल्या काही दिवसापासून कांद्याचे दर घसरत होते. याचा मोठा फटका कांदा उत्पादक शेतकऱ्यांना बसत होता. आता मात्र कांद्याचे दर वाढत आहेत. याचा फायदा शेतकऱ्यांना मिळत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या १५ दिवसांत घाऊक बाजारात कांद्याच्या भावात ५० टक्क्यांनी वाढ झाली आहे. दुसरीकडे देशाची राजधानी दिल्लीत कांद्याच्या दरात १२ रुपयांची वाढ झाली आहे.

दिल्लीत १० दिवसात कांद्याच्या दरात १२ रुपयांची वाढ

मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या पंधरवड्यात कांद्याच्या दरात ३० ते ५० टक्क्यांनी वाढ झालीय. कारण, सध्या कांद्याचा पुरवठा कमी होत आहे. त्यामुळं दरात वाढ होत असल्याचं बोललं जात आहे. विशेष म्हणजे बकरी ईदपूर्वी कांद्याची मागणी वाढली आहे. दुसरीकडे व्यापाऱ्यांनी कांद्याची साठेबाजी सुरू केली आहे. किमतींवर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र सरकार आपला हस्तक्षेप कमी करू शकेल, अशी व्यापाऱ्यांना आशा आहे. दरम्यान, गेल्या १० दिवसांत देशाची राजधानी दिल्लीत कांद्याच्या दरात तब्बल १२ रुपयांची वाढ झाली आहे.

महाराष्ट्रातही कांद्याच्या दरात वाढ

महाराष्ट्रातही कांद्याच्या दरात वाढ होताना दिसत आहे. राज्यातील अनेक घाऊक बाजारात चांगल्या दर्जाच्या कांद्याचा भाव हा ३० रुपयांच्या पुढे गेला आहे. मागणी आणि पुरवठा यातील तफावत हे अलीकडच्या काळात किमती वाढण्याचे मुख्य कारण आहे. जूनपासून बाजारात येणारा कांदा हा शेतकरी आणि व्यापाऱ्यांनी ठेवलेल्या साठ्यातून येतो. २०२३-२४ च्या रब्बी पिकाच्या संभाव्य घसरणीमुळे भाव वाढण्याची अपेक्षा असल्याने शेतकरी त्यांचा साठा उतरवत आहेत. दरम्यान, सध्या राज्यातील शेतकऱ्यांकडे कमी प्रमाणात कांदा शिल्लक आहे. ज्यावेळी शेतकऱ्यांकडे कांदा होता त्यावेळी सरकारनं कांद्यावर निर्यातबंदी घातली होती. त्यावेळी शेतकऱ्यांना मोठा फटका बसला होता.

कांद्याच्या दरात वाढ होण्याचं कारण काय

सध्या कांद्याच्या दरात वाढ होत आहे. पण दरात वाढ होण्याचं नेमकं कारण काय? असा प्रश्न तुमच्या मनात येत असेल तर ४० टक्के निर्यात शुल्कामुळे कांद्याची निर्यातह कमी होत आहे. तर १७ जून रोजी होणाऱ्या बकरी ईदनिमित्त कांद्याला देशांतर्गत मागणी मजबूत असल्याचा व्यापाऱ्यांचा दावा आहे. महाराष्ट्रातील कांद्याला दक्षिणेकडील राज्यांतून जोरदार मागणी आहे. कांद्याचे दर वाढण्याचे मुख्य कारण म्हणजे केंद्र सरकार निर्यात शुल्क हटवू शकते, अशी आशा शेतकरी आणि साठेबाजांना आहे.

मुसळधार पावसामुळे सोलापूर, परभणीत रस्ता खचला

बीडमध्ये पुलावरून नागरिकांचा जीवघेणा प्रवास

मुंबई : राज्यात अनेक भागात मुसळधार पावसाची हजेरी पाहायला मिळत आहे. अनेक जिल्ह्यात सलग तीन ते चार दिवस पावसाची हजेरी पाहायला मिळत आहे. मुंबईत दाखल झालेला मान्सून येत्या काही दिवसात महाराष्ट्र व्यापणार आहे. यादरम्यान, काही भागात मान्सूनपूर्व तर काही भागात मान्सूनच्या पावसानं झोडपून काढलं आहे. गेल्या दोन ते तीन दिवस सुरु असलेल्या जोरदार पावसामुळे काही भागात जनजीवन विस्कळीत झालं आहे. काही जिल्ह्यात शेती आणि फळबागांचंही नुकसान झालं आहे.

रस्त्यावर भला मोठा खड्डा

राज्यात अनेक ठिकाणी रस्ता खचल्याच्या घटना घडल्या आहे. सोलापूर शहरात सतत सुरु असलेल्या पावसामुळे रस्ता खचला आहे. शहरातील निराळे वस्ती ते अरविंद धामकडे जाणारा रस्ता सततच्या पावसामुळे खचला आहे. रस्त्यावर ड्रेनेजलाईनचे काम सुरु होते, त्यात मुसळधार पाऊस झाल्याने रस्त्यावर भला मोठा खड्डा पडला आहे.

संततधार पावसामुळे रस्ता खचला

परभणीच्या मानवत तालुक्यातील मंगरूळ ते रामपुरी रस्ता खचला आहे. परभणीत काल पाथरी आणि मानवत तालुक्याला पावसाने अक्षरक्ष: झोडपून काढलं होतं. परभणी जिल्ह्यातील या २ तालुक्यात मुसळधार पाऊस झाला होता. यामुळे अनेक ओढ्या-नाल्यांना पाणी आले होते. यातूनच मानवत तालुक्यातील मंगरूळ ते रामपुरी हा रस्ता पूर्णतः खचला असून यामुळे या मार्गावरची वाहतूक बंद झाली आहे.

पुलावरून नागरिकांचा जीवघेणा प्रवास : बीडच्या माजलगांव तालुक्यातील कोथाळा येथील सरस्वती नदी उसंडून वाहू लागल्याने गावातील नागरिकांना जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. काल रात्री झालेल्या मुसळधार पावसाने नदीला पूर आला आहे. बीडच्या माजलगांव तालुक्यातील कोथाळा येथील सरस्वती नदी तोडून वाहू लागल्याने गावातील नागरिकांना जीवघेणा प्रवास सुरू केला आहे. सरस्वती नदीवरील पूल लवकर दुरुस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली.

महागाईचा भडका! वर्षभरात बटाटा, कांदा, टोमॅटोच्या दरात किती झाली वाढ?

गेल्या वर्षभरात महागाई वाढल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. अनेक वस्तूंच्या दरात वाढ झालीय. महागाई दर हा ५ टक्क्यांपर्यंत गेल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, अन्नधान्याच्या महागाईत कोणतीही घट झालेली नाही. गेल्या वर्षभरात बटाटे, कांदे आणि टोमॅटोच्या दरात ८१ टक्क्यांची वाढ झालीय. यामुळे व्हेज थाळीच्या किंमतीत देखील वाढ झाल्याचं पाहायला मिळत आहे. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या १५ दिवसात कांद्याच्या घाऊक भावात ५० टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या वेबसाइटवरील आकडेवारीवर नजर टाकली तर, गेल्या वर्षभरात बटाटे, कांदा आणि टोमॅटोच्या किमतीत ८१ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. देशभरात या तिन्ही भाज्यांच्या सरासरी दरात कमालीची वाढ झालीय.

कोणत्या पिकाच्या दरात किती झाली वाढ? : ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या वेबसाइटनुसार, ३० एप्रिल २०२३ रोजी बटाट्याची सरासरी किंमत १८.८८ रुपये प्रति किलो होती. जी १० जून २०२४ पर्यंत ३०.५७ रुपये प्रति किलोवर पोहोचली आहे. म्हणजेच बटाट्याच्या दरात किलोमागे ११.६९ रुपयांची वाढ झाली आहे. याचाच अर्थ गेल्या वर्षभरात बटाट्याचे भाव ६२ टक्क्यांनी वाढले आहेत. गेल्या वर्षभरात कांद्याच्या भावात १३.५० रुपयांची वाढ झाली आहे. गेल्या वर्षभरापासून कांद्याच्या दराने सर्वसामान्यांना रडवले आहे. ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या वेबसाइटनुसार, ३० एप्रिल २०२३ रोजी कांद्याची सरासरी किंमत २०.४१ रुपये प्रति किलो होती. जे १० जून रोजी ३३.९८ रुपये झाले आहेत. याचाच अर्थ गेल्या एका वर्षात कांद्याच्या भावात ६६ टक्के म्हणजेच १३.५७ रुपये प्रतिकिलो वाढ झाली आहे.

वर्षभरात टोमॅटोच्या किंमतीत मोठी वाढ : गेल्या वर्षभरात टोमॅटोच्या दरात मोठी वाढ झाली आहे. किमतीत वर्षभरात ६० टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. बटाटे आणि कांद्याच्या तुलनेत टोमॅटोच्या दरात सर्वाधिक वाढ झाली आहे. ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या वेबसाइटनुसार, ३० एप्रिल २०२३ रोजी टोमॅटोची किरकोळ किंमत २०.५५ रुपये प्रति किलो होती. १० जून २०२४ रोजी या टोमॅटोची किंमत ३७.११ रुपयांपर्यंत गेली आहे. याचा अर्थ टोमॅटोच्या किमतीत गेल्या वर्षभरात ८१ टक्के म्हणजेच १६.५६ रुपये प्रतिकिलो वाढ झाली आहे. ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर किंमतीत मोठी वाढ : दरम्यान, ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर तर या पिकांच्या किंमतीत मोठी वाढ झालीय. ३० रुपये किलोन विकला जाणारा बटाटा ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर ४१ रुपये किलो दरानं विकला जातोय. कांदा ४३ ते ४७ रुपयाने विकला जातोय. दरम्यान, या वस्तूंच्या महागाईमुळं व्हेज थाळी देखील महाग झालीय.

राजकीय नेते निवडणुकांच्या माहोलातच, खरीप हंगाम धोक्यात

शेतकऱ्यांकडे राज्य सरकारचे दुर्लक्ष, किसान सभेचा हल्लाबोल

सध्या राज्यात मान्सून सक्रिय झाला आहे. राज्य सरकार व राज्याचा कृषी विभाग अजूनही खरीप तयारीबाबत निष्क्रियता सोडताना दिसत नसल्याचे मत किसान सभेचे नेते डॉ. अजित नवले यांनी व्यक्त केलं आहे. खरीपाची जशी शेतकरी प्राधान्याने तयारी करतात, तशीच तयारी शासन-प्रशासनाच्या वतीनेही होणे अपेक्षित असल्याचे नवले म्हणाले. मात्र, खरीप हंगामाच्या तयारीबाबत राज्य सरकारचं दुर्लक्ष असल्याचे नवले म्हणाले. राज्यभर तालुका, जिल्हा व राज्य पातळीवर लोकप्रतिनिधी, महसूल व कृषी विभागाचे अधिकारी यांच्या खरीप नियोजन बैठकांमध्ये खते, बियाणे, कीटकनाशके, कर्ज, पीक विमा, पर्जन्यमान, जलसाठ्यांची स्थिती, वीज पुरवठा, रस्त्यांची दुरुस्ती, गोदामे, बाजार सुविधा अशा संबंधित सर्व बाबींचे गांभीर्याने नियोजन होणे अपेक्षित असते. मात्र निवडणुकांच्या माहोलमधून राज्यकर्ते अजूनही बाहेर यायला तयार नसल्याने याबाबत केवळ कागदी घोडे नाचविले गेले आहेत. खरीप हंगामच त्यामुळे धोक्यात आला असल्याचे नवले म्हणाले.

कृषी विभागाची राज्यात दैना

खरीपाची तयारी करण्याची मुख्य जबाबदारी कृषी विभागाची असते. राज्याचे कृषी मंत्री, कृषी सचिव व कृषी आयुक्तांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण कृषी विभागाने खरीप हंगामाला सामोरे जाण्यासाठी अत्यंत कुशलतेने नियोजन करणे अपेक्षित असते. दुर्दैवाने राज्याच्या विस्कटलेल्या राजकीय परिस्थितीमुळं कृषी विभागाची राज्यात अक्षरशः दैना झाली असल्याचे अजित नवले म्हणाले. कृषी आयुक्त, कृषी सचिव व कृषी विभागातील विविध अधिकाऱ्यांच्या सातत्याने बदल्या होत आहेत. अनेक पदे रिक्त आहेत. विभागातील बहुतांश सर्वोच्च पदांवर 'प्रभारी' अधिकारी कार्यरत आहेत. प्रभारी चार्ज असल्याने हे अधिकारी खरीप नियोजनासाठी गंभीर नाहीत. राज्याचे मुख्यमंत्री, कृषिमंत्री व इतरही संबंधित मंत्री राजकारणात मश्गुल आहेत. राज्याचा कृषी विभाग यामुळे गलितगात्र झाला असल्याचे अजित नवले म्हणाले.

किती क्षेत्रावर होते खरीपाची पेरणी

राज्याच्या एकूण १६६.५० लाख हेक्टर पेरणी क्षेत्रापैकी १५१ लाख हेक्टर क्षेत्रावर खरिपाची पेरणी होत असते. यंदाच्या खरीप हंगामात १४७.७७ लाख हेक्टरवर खरिपाची पेरणी होण्याचा अंदाज आहे. सोयाबीनची राज्यात ५०.७० लाख हेक्टरवर पेरणी होणे अपेक्षित आहे. शिवाय कापूस ४०, भात १५.९१, मका ९.८०, ज्वारी २.१५, बाजरी ४.९५, तूर १२, मूग ३.५, उडीद ३.५, भुईमुग २.५ तर इतर पिकांची २.६ लाख हेक्टरवर पेरणी होण्याचा अंदाज आहे. इतकी पेरणी व्हावी, यासाठी राज्याला किमान १९.२८ लाख क्विंटल बियाणांची आवश्यकता असल्याचे नवले म्हणाले. पण सध्या महाबीजकडून ३.७६ लाख क्विंटल, राष्ट्रीय बीज निगमकडून ०.५९ लाख क्विंटल आणि खासगी बियाणे कंपन्यांकडून २०.६५लाख क्विंटल बियाणे उपलब्ध होणे अपेक्षित आहे. एकूण बियाण्याच्या गरजेपैकी यानुसार राज्याला तब्बल सुमारे ८० टक्के बियाण्यासाठी खासगी कंपन्यांवर अवलंबून राहावे लागत आहे. बियाण्यांच्या गुणवत्तेचे अनेक गंभीर प्रश्न यामुळे निर्माण होत असल्याचे नवले म्हणाले.

आवश्यक बियाणांच्या तुलनेत केवळ ३१ टक्के इतकेच अधिकचे बियाणे उपलब्ध

राज्यात सध्या आवश्यक बियाणांच्या तुलनेत केवळ ३१ टक्के इतकेच अधिकचे बियाणे उपलब्ध असल्याचे नवले म्हणाले. दुबार पेरणीच्या संकटाचा सामना करण्यासाठी यापेक्षा खूप अधिक बियाणे हाताशी ठेवण्याची आवश्यकता आहे. खरीप हंगामात राज्यातील शेतकऱ्यांना ३८ लाख टन खताची आवश्यकता आहे. खरीप हंगामात ४८ लाख टन रासायनिक खतांचा पुरवठा करण्याचा प्रस्ताव कृषी विभागाने दिला होता. त्यांपैकी ४५ लाख टन खताच्या नियोजनाला मंजुरी मिळाली आहे. पैकी सध्या केवळ ३१.५४ लाख टन इतकाच खतसाठा उपलब्ध आहे.

उपलब्धता पाहता शेतकऱ्यांना यंदाही एका एका गोणीसाठी रांगेत उभे राहण्याची वेळ येईल अशी परिस्थिती आहे. दुबार पेरणीचे संकट आले तर ही परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते. खताची वाढीव दराने विक्री केल्यास, बोगस खते विकल्यास किंवा खतांचे लिंकिंग केल्यास कारवाईचे इशारे दिले गेले आहेत. मात्र असे इशारे अनेकदा 'अर्थ'पूर्ण व्यवहारांसाठीच असल्याचे अनुभव आहेत. शेतकऱ्यांना अल्प व्याजदराने पुरेसे कर्ज व नैसर्गिक आपत्तीमध्ये 'खरेखुरे' पीक विमा संरक्षण उपलब्ध असणे आवश्यक असल्याचे नवले म्हणाले. अशा या सर्व परिस्थितीत सरकारने आता निवडणुकीतून बाहेर येऊन हे सर्व प्रश्न गांभीर्याने घ्यावेत अशी मागणी किसान सभेनं केली आहे.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

१६६५ : शिवाजीमहाराजांनी राजा जयसिंगची भेट घेऊन त्यांच्याबरोबर सलोख्याची बोलणी करण्यासाठी त्याच्या शिबिरामध्ये प्रवेश केला.

१७७६ : अमेरिका देशाला स्वातंत्र्य घोषित करण्यासाठी घोषणापत्र तयार करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली.

१८६६ : अलाहाबाद उच्च न्यायालयाची स्थापना.

१८९५ : पॅरिस-बॉर्डोक्स-पॅरिस ही इतिहासातील पहिली ऑटोमोबाईल रेस किंवा पहिली मोटर रेस झाली.

१९०१ : न्यूझीलंडने कूक बेटे बळकावली.

१९०७ : नॉर्धनम्प्टनशायर क्रिकेट संघ १२ धावांत सर्वबाद.

१९२१ : ब्राझील देशांतील महिलांना मतदान करण्याचा अधिकार प्राप्त झाला.

१९३५ : एडविन आर्मस्ट्राँगने पहिल्यांदा एफ.एम. लहरींचे प्रसारण केले.

१९३७ : जोसेफ स्टालिनने आपल्याच ८ लष्करी अधिकार्यांना ठार केले.

१९५५ : जगातील पहिल्या मैग्नेशियम जेट विमानाने भरारी घेतली.

१९६४ : पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या इच्छेप्रमाणे त्यांच्या अस्थ्या संपूर्ण देशभर विसर्जित करण्यात आल्या.

१९७० : ॲनामे हेस, एलिझाबेथ पी. हॉइसिंग्टन या अमेरिकन सैन्यातील पहिल्या स्त्री जनरल झाल्या.

१९७२ : दारू पिउन रेल्वे चालवल्यामुळे एल्थाम वेल हॉल येथे रेल्वे अपघात होऊन ६ जण ठार व १२६ जण जखमी झाले.

१९९७ : सुखोई-३०के ही रशियन बनावटीची विमाने भारतीय हवाई दलात दाखल.

१९९८ : कॉम्पॅक कॉम्पुटर कंपनी ने डिजिटल एक़्विपमेंट कॉर्पोरेशन विकत घेण्यासाठी ९ अब्ज अमेरिकी डॉलर मध्ये इतिहासातील सर्वात मोठा सौदा केला.

१९८७ : १६० वर्षाच्या कालखंडात ब्रिटीश देशाच्या पंतप्रधान पदावर सलग तिसऱ्यांदा विराजमान होणाऱ्या पंतप्रधान मार्गारेट थॅचर या पहिल्या ब्रिटीश नागरिक ठरल्या.

२००४ : कॅसिनी-हायगेन्स अंतराळयान शनिचा उपग्रह फीबी जवळून गेले.

२००७ : बांगलादेशातील चितगावमध्ये भूस्खलनामुळे १३० लोक ठार झाले.

२००८ : भ्रष्ट्राचाराच्या आरोपाखाली तुरुंगात कैद असलेल्या बांगलादेशाच्या पूर्व पंतप्रधान शेख हसीन वाजेद यांची सुटका करण्यात आली.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१५ : भारतीय-श्रीलंकन छायाचित्रकार जुलिया मार्गारेट कॅमेरॉन यांचा जन्म. (मृत्यू: २६ जानेवारी १८७९)

१८८० : अमेरिकेचे पहिले संसद सदस्य रैफिन यांचा जन्मदिन.

१८९४ : टोयोटा मोटर कंपनीचे संस्थापक काइचिरो टोयोडा यांचा जन्म. (मृत्यू: २७ मार्च १९५२)

१८९७ : क्रांतिकारक रामप्रसाद बिस्मिल यांचा जन्म. (मृत्यू: १९ डिसेंबर १९२७)

१९०९ : भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश व राजकारणी तसचं, निट्टे एज्युकेशन ट्रस्टचे संस्थापक के.एस. हेगडे यांचा जन्मदिन.

१९२४ : साली भारतीय व्यंगचित्रकार, पत्रकार आणि लेखक अत्तूपुरथू मॅथ्यू अब्राहम उर्फ अबू अब्राहम यांचा जन्मदिन.

१९३७ : साली पद्मभूषण व संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय नर्तक, नृत्यदिग्दर्शक आणि शैक्षणिक तसचं, नालंदा नृत्य संशोधन केंद्राच्या संस्थापक-दिग्दर्शिका आणि मुंबईतील नालंदा नृत्य कला महाविद्यालयाच्या संस्थापक-प्राचार्या कनक रेले यांचा जन्मदिन.

१९४२ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय उत्प्रेरक वैज्ञानिक, आणि औद्योगिक संशोधन परिषदेच्या राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे माजी संचालक पॉल रत्नसामी यांचा जन्मदिन.

१९४८ : बिहारचे मुख्यमंत्री लालूप्रसाद यादव यांचा जन्म.

१९८२ : टंबलर चे सहसंस्थापक मार्को आर्मेंट यांचा जन्म.

१९८९ : भारतीय पॅरा-बॅडमिंटनपटू मानसी गिरीशचंद्र जोशी यांचा जन्मदिन.

१९९० : साली अर्जुन पुरस्कार सन्मानित भारतीय हॉकी पटू सविता पुनिया यांचा जन्मदिन.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

३२३इ.पुर्व : मॅसेडोनियाचा राजा अलेक्झांडर द ग्रेट यांचे निधन. (जन्म: २० जुलै ख्रिस्त पूर्व ३५६)

१७२७ : इंग्लंडचा राजा जॉर्ज (पहिला) यांचे निधन. (जन्म: २८ मे १६६०)

१९०३ : सर्बियाचा अलेक्झांडर (पहिला) यांची सर्बियन पत्नी ड्रगा माशिन यांचे निधन. (जन्म: ११ सप्टेंबर १८६४)

१९२४ : इतिहासाचार्य, लेखक, नाटककार व कवी वासुदेव वामन तथा वासुदेवशास्त्री खरे यांचे निधन. (जन्म: ५ ऑगस्ट १८५८)

१९५० : प्रसिद्ध महाराष्ट्रीयन मराठी भाषिक लेखक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि स्वातंत्र्यसेनानी तसचं, भारतीय राष्ट्रीय शिक्षक म्हणून ओळखले लोकप्रिय असणारे पांडुरंग सदाशिव साने उर्फ साने गुरुजी यांचे निधन.

१९८३ : घन:श्याम बिर्ला, भारतीय उद्योगपती. (जन्म: १० एप्रिल १८९४)

१९९७ : भारतीय सर्वोत्कृष्ट राष्ट्रीय पुरस्कार पद्मश्री व पद्मभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय दूर अंतरीय जलतरणपटू आणि व्यावसायिक तसचं, इग्लिश खाडी पार करणारे पहिले भारतीय नागरिक मिहीर सेन यांचे निधन. (जन्म: १६ नोव्हेंबर १९३०)

२००० : राजेश पायलट, अखिल भारतीय कॉंग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री. (जन्म: १० फेब्रुवारी १९४५)



ओढ्याचे पाणी शेतात व दलित वस्तीत घुसले; बेलोरा ग्रामस्थांचे बेहाल

दिंद्रुड प्रतिनिधी :

माजलगाव तालुक्यातील बेलुरा येथे गेल्या दोन दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे ओढ्यातील पाणी शेतात व रहदारी असलेल्या दलित वस्तीत घुसून मोठे नुकसान झाले आहे. चुकीच्या पद्धतीने ओढ्यावर टाकलेल्या पुला मुळे हे नुकसान होत असल्याने बेलोरा ग्रामस्थ संताप व्यक्त करत आहेत. प्रशासनाने तात्काळ दखल न घेतल्यास आंदोलनाचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

बेलोरा येथे गावात जाणाऱ्या रहदारी रस्त्यावर गतवर्षी पुल बांधण्यात आला आहे. पुलाची उंची व आत टाकलेली पाईपलाईन चुकीच्या पद्धतीने झाल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. या पुलामुळे ओढ्यावर आलेले पाणी दलित वस्ती व आसपासच्या शेतात घुसत आहे. त्यामुळे दलित वस्तीतील घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून शेतात पाणी घुसल्याने शेतकऱ्याची जमीन वाहून जात आहे. ओढ्याच्या दोन्ही बाजूने संरक्षण भिंत करणे गरजेचे आहे.पुलाच्या शेजारील रस्ता पाण्याने खचून रस्त्याचे अतोनात नुकसान झाले असून संबंधित प्रशासनाने तात्काळ दखल घेत उचित उपाययोजना करण्याची मागणी बेलुरा ग्रामस्थ करत आहेत. ओढ्यालगत असलेल्या गावाला पिण्याच्या पाण्यासाठी असलेल्या हातपंपात ओढ्यातील पाणी जाऊन पाणी अशुद्ध झाले आहे. यामुळे दलित वस्तीतील बेलोरा ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी हाल सोसावे आहेत. प्रशासनाने तात्काळ उपाय योजना न केल्यास आंदोलनाचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

थोडक्यात

निट परीक्षेत यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचां सत्कार

माजलगाव : शहरातील निट परीक्षेमध्ये विशेष गुण मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ दि १० जुन सोमवार रोजी संपन्न झाला. यामध्ये कु.दीप्ती मोहनराव रांजवण ६७८ व कु. अस्मिता माऊली सुरवसे ६२७ गुण मिळवल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक डॉ.उद्धव नाईकनवरे, भगवानराव कदम, निवृत्ती बप्पा शेंडगे, माऊली शेंडगे,गरुड साहेब,विनोद जाधव सर,युवराज ठोंबरे इत्यादी उपस्थित होते.

रोजगार निर्मिती कार्यक्रमासाठी अर्ज करण्याचे आवाहन

बीड: जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयामार्फत बेरोजगारांना उत्पादन उद्योग व सेवा उद्योगांसाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम ही योजना गत ४ वर्षापासून राज्यात राबविण्यात येत आहे. सदर योजनेअंतर्गत सेवा उद्योगासाठी रुपये २०.०० लक्ष मराठी पर्यंत उत्पादन उद्योगांसाठी रुपये ५०.०० लक्षापर्यंत बँकेमार्फत अर्थसहाय्य दिले जाते. या योजनेअंतर्गत विभागामार्फत बँकेच्या कर्ज मंजुरीनंतर जास्तीत जास्त ३५ टक्के (पर्यंत जात प्रवर्ग उद्योग कार्यक्षेत्रानुसार) अनुदान दिले जाते. तसेच रुपये १०. ०० लक्षाच्या कर्ज मर्यादेपर्यंत (सेवा उद्योग उत्पादन उद्योग) शिक्षणाची अट नाही. दर सोमवारी छानणी नंतर ऑनलाइन कर्ज प्रस्ताव बँकांना मंजुरी स्तव शिफारस करण्यात येतात व कर्ज मंजुरी /वाटपानंर अनुदान ऑनलाईन बँकेत जमा करण्यात येते. इच्छुक अर्जदारांनी पुढील वेबसाईटवर ऑनलाईन अर्ज खालील कागदपत्रासह दाखल करावेत. आवश्यक कागदपत्रे पासपोर्ट फोटो, आधार कार्ड, पॅन कार्ड, वयाचा दाखला, मार्कशीट, व्यवसायाचा प्रकल्प अहवाल, आवश्यकतेनुसार जात प्रमाणपत्र व ग्रामीण भागासाठी लोकसंख्या चा दाखला ही कागदपत्रे सादर करावेत असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक यांनी केले आहे.

मान्सून पुर्व पावसाने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत

खरीपाच्या पेरणीसाठी शेतकऱ्यांची लगबग सुरू

माजलगाव। प्रतिनिधी

तालुक्यात परवा झालेल्या मान्सुनपुर्व पावसामुळे शेतकऱ्यांच्या अशा पल्लवीत झाल्या असुन दुष्काळी स्थितीची मरगळ संपुष्टात येऊन आता आकाशात नव्या ''आशेचे'' ढग जमू लागले आहेत, शेतकऱ्यांनी आपापल्या शेतातील पेरणीपूर्व मशागतीची कामे पुर्ण करुन शेतकरी पेरणीसाठी सज्ज झाला आहे परंतु बि-बियाणे व रसायनीक खते खरेदीसाठी शेतकऱ्यांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत असुन शासनाने शेतकऱ्यांना रसायनीक खते व बि-बियाणे खरेदीसाठी तातडीने आर्थिक मदत करावी आशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

जून महिना सुरु झाला असुन तालुक्यात मान्सूनचा पाऊस पडायला आणखी अवकाश असुन शेतकऱ्यांनी आपापल्या शेतातील पेरणीपूर्वी मशागतीची जवळपास सर्वच शेतकऱ्यांनी कामे पूर्ण केली असुन शेतकरी पेरणीसाठी सज्ज झाले आहेत.

दोन दिवसांपासून जिल्ह्यात काही ठिकाणी पावसाने हजेरी लावली आहे. त्यामुळे ज्या भागात पावसाने हजेरी लावली त्या परिसरात शेतकऱ्यांची पेरणीसाठी लगबग सुरू झालेली आहे. तर अद्याप काही भागात पाऊस झालेला नसल्याने अनेक शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. दि. ८ रोजी काही गावात पडलेल्या पावसाने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. शेतकऱ्यांनी कपाशी लागवड, सोयाबीनच्या पेरणीबरोबरच इतर खरिपाच्या पेरणीस प्रारंभ केला आहे. जमिनीतील ओल व पावसाळी वातावरणााने शेतकरी पेरणीच्या कामाला लागल्याचे चित्र तालुक्यात दिसून येत आहे.

लुट न थांबल्यास जिल्हाधिकाऱ्यांची गाडी आडविणार-थावरे

माजलगांव । प्रतिनिधी

माजलगांव तालुक्यामध्ये रात्री पाऊस झाला त्यामुळे शेतकरी बि बियाणे खरेदी करण्यासाठी सकाळपासुन मोंढ्यात गर्दी करून आहेत. काही दुकानदार शेतकऱ्यांची लुट करत आहेत. हि लुट न थांबल्यास मंगळवारी जिल्हाधिकारी यांची गाडी अडवणार असल्याचा इशारा भाई गंगाभिषण थावरे यांनी दिला. शेतकऱ्यांची लुट थांबविण्यासाठी थावरे सकाळपासुन मोंढ्यात ठिय्या मांडुन बसलेले आहेत.

खरीप हंगामात शेतकरी मोठ्या प्रमाणात बि बियाणे खते खरेदी करत असतात. काही कृषी दुकानदार शेतकऱ्यांची आर्थिक लुट करतात. अशा दुकानदारा विरोधात कोणतीही कारवाई केली जात नाही. माजलगांव तालुक्यात काल चांगला पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी सकाळपासुन बियाणे खरेदी करण्यासाठी मोंढ्यात गर्दी केली.

शेतकऱ्यांची लुट थांबविण्यासाठी भाई गंगाभिषण थावरे माजलगांवच्या मोंढ्यात ठिय्या मांडुनआहेत. शेतकऱ्यांची लुट न थांबल्यास मंगळवारी जिल्हाधिकारी दिपा मुधोळ-मुंडे यांची गाडी अडविणार असल्याचा इशारा गंगाभिषण थावरे यांनी दिला आहे.

वृत्तपत्राच्या विक्रीतून दोन्ही मुली झाल्या इंजिनिअर

बीड । प्रतिनिधी

सुमूर्ती साहेबराव वाघिरे मूळचे बीड तालुक्यातील उदंड वडगाव येथील रहिवासी. आई-वडील, दोन बहिणी व एक भाऊ असा त्यांचा परिवार आहे. वडिलांनी शेतमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह केला. आईवडिलांनी दोन्ही मुलांना चांगले शिक्षण दिले. सुमूर्ती वाघिरे यांचे शिक्षण बीएपर्यंत झालेले आहे. शिक्षण घेत असताना प्रवासाला लागणारे पैसे नसल्याने दूध वाहतूक करणाऱ्या माल ट्रकवर क्लीनर म्हणून काम केले. १९८५ पासून अकरावी, तसेच पदवीपर्यंत शिक्षण के.एस. के. महाविद्यालयात झाले. त्यानंतर बाबासाहेब मस्के यांच्याकडे पेपर वाटपाचे काम मिळाले. पेपर वाटपाचे काम करत असताना १९९० ला जनरल स्टोअर्स दुकान टाकले. त्यात यश आले नाही. कॉम्प्युटर ऑपरेटर म्हणून व वितरण व्यवस्थापक म्हणून दैनिकांमध्ये काम सुरू केले. त्यानंतर वर्ष २००० मध्ये नगर रोड येथे शिवम बुक स्टॉल व न्यूज पेपर एजन्सी चालू केली, ती आजतागायत सुरू आहे. पत्नी अलकाच्या साथीने वृत्तपत्र विक्रीचा व्यवसाय चांगल्या प्रकारे सांभाळत वाढवला. त्यात कोरोनासारखे संकट आले. पण, न डगमगता मोठ्या कष्टाने व्यवसाय सांभाळला.

वृत्तपत्र ही त्यांच्यासाठी लक्ष्मी आहे, असे ते मानतात. त्याच वृत्तपत्राच्या विक्रीमधून दोन मुली इंजिनिअर आहेत. दोघीही आज नोकरी करत आहेत. मुलगादेखील कॉम्प्युटर इंजिनिअरचे शिक्षण घेत आहे. बीडसारख्या शहरात काहीही नसताना स्वतःचे दोन फ्लॅट व दुकान आहे. आज एखादा मुलगा वृत्तपत्र टाकण्यासाठी आला नाही, तर ते स्वतः वृत्तपत्र टाकण्यासाठी जातात. यात त्यांना गैर वाटत नाही. आज अगदी शून्यातून विश्व निर्माण केल्याचे समाधान ते मानतात. त्यांनी मुलांना उच्च शिक्षण देऊन स्वतःच्या पायावर उभे केले. तसेच, आणखी आठ ते दहा मुलांना रोजगार उपलब्ध करून दिला. आज ते बीडच्या वृत्तपत्र संघटनेचे अध्यक्ष आहेत, तसेच राज्य वृत्तपत्र संघटनेचे सदस्य आहेत.

पोलिस अधिकाऱ्यांसाठी जनजागृती कार्यक्रम

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे निर्देशानुसार तसेच आनंद एल. यावलकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश बीड तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड यांचे आदेशानुसार जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालय, बीड येथे बाल कल्याण पोलिस अधिकारी तसेच विधी संघर्षग्रस्त बालकांसाठी विशेष पोलिस पथक यांचेसाठी जनजागरण/ मार्गदर्शन पर कार्यक्रम दिनांक ११ जुन २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान टी.ए.असरकर, अध्यक्षा बालन्यायमंडळ, बीड तथा ३रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर यांनी भुषविले. जी.जी. सोनी, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड, तथा दिवाणी न्यायाधीश, व.स्तर यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. टी.ए.असरकर, अध्यक्षा बालन्यायमंडळ, बीड यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, पोलिस अधिकारी कर्मचारी यांनी सर्वप्रथम विधीसंघर्षग्रस्त बालकाच्या वयाची खात्री करणे आवश्यक आहे. त्यासाठी बालकाचा शाळा सोडल्याचा दाखला वगैरे कागदपत्राची पडताळणी करून वयाबाबात खातरजमा करावी जर जन्मतारखेबाबत कोणतेही कागदपत्र उपलब्ध नसतील तर बालन्यायमंडळाच्या परवानगी नुसार विधीसंघर्षग्रस्त बालकाची वैद्यकीय तपासणी करून वयाची खात्री करता येते. तसेच इतर बाबतीत उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमासाठी ए.एम.ढवळे, १ले अतिरिक्त सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर बीड. तसेच टी.एस. कोरहाळे, २ रे अतिरिक्त सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर बीड. हया उपस्थित होत्या. सदर कार्यक्रमासाठी बहुतांश पोलिस अधिकारी कर्मचारी प्रत्यक्ष व आभासी पद्धतीने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सचिन पांडकर अप्पर पोलिस अधिक्षक, बीड यांनी केले.

हुमनी किडींच्या नियंत्रणासाठी उपाय योजना

बीड । प्रतिनिधी

हुमणी किडी प्रामुख्याने जमिनीमध्ये राहून पिकाच्या मुळ्या खाऊन आर्थिक नुकसान करते. या किडीमुळे प्रामुख्याने ऊस, भुईमूग, ज्वारी, बाजरी व मका पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. या किडीचे लवकर नियंत्रण झाल्यास पिकाचे ३० ते ७० टक्के नुकसान होऊ शकते. म्हणूनच या किडीचा जीवनक्रम समजून एकात्मिक नियंत्रण करणे गरजेचे आहे. जेणेकरून पुढील नुकसान टाळता येईल. प्रथम अवस्था पांढरीशुभ्र, पिवळे डोके, ७ मी.मी.लांबी, छातीवर पायांच्या तीन जोड्या, पूर्ण विकसित आळया पिवळट पांढऱ्या, डोक्याच्या रंग बदामी व अर्ध गोलाकार, अळीची लांबी सुमारे ३५ ते ४५ मि.मी.प्रौढ भुंगेरा तपकिरी किंवा बदामी रंगाचे व १७ ते २० मि.मी. लांब ८ मी.मी. पर्यंत जाड असतात. पंखाची प्रथम जोडी ढालीप्रमाणे मजबूत. पंखाची दुसरी जोडी पातळ व घडी करण्यासाठी लवचिक असून, पहिल्या जोडी खाली सुरक्षित व पंख उघडताना मदत करते.

मोसमी पावसाला सुरुवात होताच हूमणी भुंगे- यांचे प्रजनन होत असते. ते पुढे पिकासाठी घातक ठरत असतात. संभाव्य धोका टाळण्यासाठी प्रजनन होऊ नये, यासाठी प्रकाश सापळे लावणे गरजेचे आहे. पावसाला सुरुवात होताच हुमणी नर-मादी भुंगेरे प्रजननासाठी सायंकाळी जमिनीतून बाहेर पडत असतात. एक मादी एकावेळी ५० ते ६० अंडी घालते. त्यातून हुमणीच्या अळया तयार होतात. याच अळ्या कोवळ्या पिकांचा नाश करीत असतात. हे टाळण्यासाठी प्रजननावरच नियंत्रण मिळवणे हा सोपा उपाय आहे

रुंद वरंबा सरी लागवड तंत्रज्ञान पिकासाठी नियोजनाबाबत मार्गदर्शन

बीड । प्रतिनिधी

खरीप हंगामातील आढळून येणारे पावसाचे दीर्घकालीन खंड किंवा अधिकच्या पावसामुळे साचून राहणारे पाणी यामुळे पिकांची वाढ आणि उत्पादनावर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे पीक उत्पादनात घट येते. अशावेळी पावसाचे जास्तीत जास्त पाणी जमिनीत मुरवणे तसेच अधिक पावसात अतिरिक्त पाणी शेताबाहेर सुरक्षितपणे निचरा करणे, पीक वाढीसाठी अनुकूल गादी वाफे, रुंद वरंबा बी.बी एफ तयार करणे आणि त्यावर पिकांची लागवड करणे फायदेशीर ठरते. रुंद वरंबा सरी पद्धत (बीबीएफ) पिकांची जोमदार उगवण, एकाच वेळी वाफे तयार करणे, पेरणी करणे, खत देणे आणि विशेष म्हणजे कमी पाऊस किंवा अधिक पावसाच्या परिस्थितीमध्ये फायदेशीर ठरते.

रुंद वरंबा सरी पध्दती सोयाबीन पेरणी वरंब्यावर करण्यात येते. दोन्ही बाजूने सरी पाडण्यात येते व कमी पर्जन्यमान या स-यामध्ये पावसाचे पाणी साठवून जमीनीत मुरते त्यामुळे जमिनीत ओलावा अधिक काळ टिकून राहतो. तसेच पाउस जास्त पडला तर या स-यांमधून पाण्याचा निचरा होतो, आपण सोयाबीन पिकाचा

विचार केला तर सोयाबिन पिकास पाण्याचा ताण बसला तर उत्पादनात घट दिसून येते. तसेच पाऊस जास्त झाला तर भारी जमिनीत पाणी साचून पिकांचे नुकसान होते. त्यामळे सोयाबीनसाठी रुंद वरंबा व सरी पध्दती जलसंधारण तसेच अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याच्या दृष्टीने उपयुक्त आहे.

पावसाचे पाणी स-यामध्ये मुरते त्यामुळे मूलस्थानी जल संवर्धन होऊन पावसाच्या दीर्घकालीन खंड काळात याचा लाभ होतो. या पद्धतीमुळे चांगली मशागत होऊन बियाणांसाठी चांगले वंरबे तयार होतात. गादी वाफे किंवा दरम्यान मध्ये हवा खेळती राहून पाणी व हवा यांचे योग्य प्रमाण राखले जाते. बियाण्यांची उगवण चांगली होते व पिकांची पुढील वाढ जोमदारपणे होते.अधिक पाऊस झाल्यास अधिकचे पाणी योग्य पद्धतीने निचरा होण्यास रुंद वंरबे सोबतच दोन्ही बाजूकडील सऱ्या मुळे मदत होते. बीबीएफ यंत्राच्या साह्याने आवश्यक रुंदीचे वंरबे दोन्ही बाजूने सऱ्यासह तयार करण. पेरणी करणे व खते देणे अशी विविध कामे एकाच वेळी करता येतात. मजुरांची तसेच ऊर्जेची जवळजवळ ४० ते ६० टक्के बचत होते. परिस्थितीनुसार सरासरी पाच ते सात हेक्टर क्षेत्र प्रतिदिन पेरणी करता येते. पारंपरिक पद्धतीच्या तुलनेत सरासरी २० ते २५ टक्के पर्यंत अधिक जलसंधारण आणि २० ते २५ टक्के पर्याय उत्पादनात वाढ होते. आंतरमशागत करणे असे शक्य होते तसेच तन नियंत्रणाच्या दृष्टीने उगवण पूर्व तणनाशकांचा वापर केल्यास प्रभावी तणनियंत्रण होते. सोयाबीन तसेच कपाशी, तूर, हळद इत्यादी पिकांची लागवड या पद्धतीने करता येते.

बीबीएस यंत्राच्या साह्याने लागवड पद्धत

योग्य खोलीवर व प्रमाणामध्ये बियाणांची खतासह रुंद वंरबा सरी पद्धतीने विविध पिकांची पेरणी करण्यासाठी बी एफ यंत्र विकसित केले आहे. याशिवाय कपाशी, तूर, हळद, आले या पिकांची लागवड या पद्धतीने करता येते. रब्बी हंगामात भुईमुग व हरभरा लागवड या यंत्राने करता येते. बीबीएफ यंत्राच्या साह्याने पिकानुसार योग्य रुंदीचे व वंरबे तयार करून जास्त अंतरावरील पिकांच्या दोन ओळी तर कमी अंतरावरील पिकांच्या चार ओळी रुंद व वंरब्यावर येतील यानुसार नियोजन करून वरंब्यावर लागवड करता येते.

सपाट वाफे पद्धतीच्या तुलनेत रुंद वरंबासरी पद्धतीमुळे सोयाबीन उगवण दोन दिवस अगोदर तसेच जोमदार झाल्याचे प्रयोगाने सिद्ध झाले आह. या यंत्राद्वारे रुंद वरंबा बनवणे, बियाणे पेरणी, खते देणे, रासनी करणे आणि उगवण पूर्व तणनाशकाची फवारणी करणे. अशी चार कामे एकाच वेळी होतात. यंत्रामुळे मजूर, वेळ आणि इंधनाची बचत होते. बियाणे, रासायनिक खते अशी निविष्ठामध्ये २० टक्क्यापर्यंत बचत होते.याशिवाय दुसऱ्या टप्प्यात सऱ्या मोकळ्या करणे, कोळपणी करणे, कीटकनाशकांची फवारणी करणे अशी विविध कामे एकाच वेळी करता येतात.

बालमजुरी बंद करण्यासाठी आवाहन

बीड । प्रतिनिधी

भारतीय राज्यघटनेनुसार शिक्षण आणि आरोग्य बालकांचे मुलभूत अधिकार आहेत. बालकांचे हे अधिकार अबाधित ठेवण्यासाठी बालमजुरी प्रथा कायम स्वरूपी नष्ट होणे आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाने हे मान्य केले असून १४ वर्षाखालील मुलांना बालमजुरी करण्यात्याच अनुषंगाने केंद्र शासनाने बाल व किशोरवयीन कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम, १९८६ पारित केलेला आहे. अधिनियमानुसार १४ वर्षाखालील बालकांना कोणत्याही व्यवसाय/प्रक्रियेत कामावर ठेवणे तसेच १४ वर्ष पूर्ण परंतु १८ वर्ष पूर्ण न झालेल्या किशोरवयीन मुलांना धोकादायक उद्योग व प्रक्रियेमध्ये कामावर ठेवणे गुन्हा आहे. जर मालकाने / नियोक्त्याने बाल अथवा किशारवयीन मुलांना कामावर ठेवल्यास त्यांस ६महिने व २ वर्षापर्यंत कारावास किंवा रु.२०,००० (रुपये वीस हजार) ते रु.५०,०००/- (रुपये पन्नास हजार) पर्यत दंड किंवा दोन्हीही अशी शिक्षा होऊ शकते अशी तरतूद आहे. बालमजुरी हि एक अनिष्ट प्रथा असून ती सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक समस्यांशी निगडित असल्यामुळे या प्रथेविरुध्द विस्तृत प्रमाणात जनजागृती होणे आवश्यक आहे. दरवर्षी १२ जून हा दिवस जागतिक बाल कामगार प्रथा विरोधी दिवस म्हणून देशभर पाळला जातो. करिता बीड जिल्ह्यातील सर्व दुकाने / आस्थापना / हॉटेल / धाबे / गॅरेजेस / जूस सेंटर / रसवंती गृहे / बेकरी मालकांनी १४ वर्षाखालील बालकांना कोणत्याही व्यवसाय अथवा प्रक्रियेत तसेच १४ वर्ष पूर्ण परंतु १८ वर्ष पूर्ण न झालेल्या किशोरवयीन मुलांना धोकादायक उद्योग व प्रक्रियेमध्ये कामावर ठेऊ नये असे आवाहन सरकारी कामगार अधिकारी यांनी केले आहे.

टीसी हरवला आहे

रोहित चंद्रशेखर शिंदे, छत्रपती शिवाजी विद्यालय टाकळसिंग या नावाचा दहावी पास टीसी आष्टी- टाकळसिग गाडीत प्रवासात हरवला आहे सापडल्यास संपर्क साधावा.

संपर्क
८९९९६७१००६

टीसी हरवला आहे

अक्षरा गजानन सांळुके या नावाचा दहावी पासचा टीसी सुभाष रोड परिसरात प्रवासादरम्यान हरवला आहे. सापडल्यास संपर्क साधावा.

संपर्क
८६३७७०१८१६
७५८८१५०९७८

राज्य
लोकतंत्र
बुधवार दि.१२ जून २०२४

स्वाराती रुग्णालयातील कालबाह्य झालेली सीटी स्कॅन मशीन तात्पुरत्या अवस्थेत पुन्हा सुरु

आमदार नमिता मुंदडांचे प्रयत्न यशस्वी; नवीन मशीनसाठी प्रयत्न सुरु

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयातील सीटी स्कॅन मशीन मागील सात महिन्यापासून बंद पडली होती. आ. नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्यानंतर अनेक अडचणींवर मात करत हि मशीन तात्पुरत्या अवस्थेत पुन्हा सुरु करण्यात यश मिळाले आहे. त्यामुळे अति अत्यावस्थ रुग्णांची गैरसोय टळणार आहे. दरम्यान, कालबाह्य झालेली सध्याची मशीन कितपत चालेल याबाबत शंका असल्याने आ. नमिता मुंदडा यांनी नवीन सीटी स्कॅन मशीनसाठी युद्धपातळीवर पाठपुरावा सुरु केला आहे.

अंबाजोगाई येथील स्वाराती रुग्णालयाचा अंबाजोगाई, बीडसह आजूबाजूच्या जिल्ह्यातील गोरगरीब रुग्णांना मोठा आधार आहे. रुग्णांच्या सोयीसाठी अत्यल्प दरात अद्यावत यंत्रसामुग्रीद्वारे तपासणी करून उपचार होत असल्याने येथे रुग्णांची दररोज प्रचंड गर्दी असते. मात्र, मागील सात महिन्यापासून येथील सीटी स्कॅन मशीन बंद पडल्याने रुग्णांची गैरसोय होऊ लागली होत. सर्व सामान्यपणे सीटी स्कॅन मशीनचे आयुष्य १० वर्षांचे असते, मात्र स्वाराती रुग्णालयातील मशीनला १२ वर्षे झालेली आहेत. त्यामुळे केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे नवीन मशीनसाठी पाठपुरावा सुरु केला. परंतु, हि प्रक्रिया वेल्काहू असल्याने तोपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात जुनी मशीन देखील सुरु करावी यासाठी आ. मुंदडा यांनी प्रयत्न सुरु केले. परंतु बिले थकल्याने फिलिप्स कंपनीकडून योग्य प्रतिसाद मिळत नव्हता. अखेर मुंदडा यांनी पुढाकार घेत अधिष्ठाता आणि प्स कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत स्वतःच्या निवासस्थानी बैठक घेतली. त्यानुसार, फिलिप्स कंपनीचे गतवर्षीचे थकीत ४७ लाख रुपयांचे यावर्षी डिसेंबरपर्यंत टप्प्याटप्प्याने देण्याचे ठरले. तसेच चालू वर्षाचे संपूर्ण ४४ लाख रुपयांचे बिल देण्याऐवजी ११ लाख रुपये लेबर चार्जमध्ये मशीन दुरुस्त करून देण्यासाठी आ. मुंदडा यांनी फिलिप्स कंपनीला तयार केले. दरम्यान, रुग्णालयाचे अधिष्ठाता यांनी इतर रुग्णालयाच्या अधिष्ठातांशी संपर्क साधून त्यांच्याकडील कालबाह्य झालेल्या मशीनचे चालू असलेले सेकंद हॅण्ड पार्ट देण्यासाठी विनंती केली. सर्व प्रशासकीय प्रक्रिया पार पडल्यानंतर मशीनचे जुने पार्ट उपलब्ध झाले. त्यानंतर फिलिप्स कंपनीच्या तंत्रज्ञांनी स्वाराती मधील मशीनला हे पार्ट जोडून मशीन सुरु करून दिली. त्यामुळे सद्यस्थितीत तरी अति आवश्यक रुग्णांसाठी या मशीनचा वापर करणे शक्य होणार असल्याने रुग्णांना दिलासा मिळाला आहे.

नवीन मशीनसाठी प्रयत्नशील

'स्वाराती'मध्ये येणाऱ्या रुग्णांची संख्या पाहता सध्याची मशीन कालबाह्य झाल्याने राज्य शासनाकडे नवीन मशीनची मागणी केली आहे. त्यासाठी सर्व स्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरु असून त्यास लवकरच यश मिळेल. तोपर्यंत तात्पुरत्या अवस्थेत जुनी मशीन सुरु करून घेतली आहे. केवळ अतिगंभीर रुग्णांसाठी मशीनचा उपयोग करणे शक्य आहे.

– आ. नमिता मुंदडा, केज विधानसभा मतदार संघ

मशीन सुरु झाली, काळजी घेणे आवश्यक

कालमर्यादा संपूनही रुग्णांची गरज लक्षात घेता सध्याची मशीन कार्यान्वित करण्यात आली आहे. जुनी असल्याने मशीन लवकर गरम होत आहे. मशीनचा सतत वापर करणे शक्य नसून अधूनमधून खंड देणे गरजेचे आहे. त्यामुळे केवळ अति अत्यावस्थ रुग्णांसाठीच मशीनचा वापर करण्यात येणार आहे. अडचण लक्षात घेता रुग्ण आणि नातेवाईकांनी सहकार्य करावे.

– डॉ. शंकर धपाटे, अधिष्ठाता

गहिनीनाथ गडाचे मठाधिपती ह.भ.प.विठ्ठल महाराज यांना हॉस्पिटलमधून सुखरूप डिचार्ज

ह.भ.प. विठ्ठल महाराज यांचे जन्मभूमी असलेल्या म्हसोबाचीवाडी येथे जंगी स्वागत

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

गहिनीनाथ गडाचे सर्वे सर्व श्री महतं ह.भ.प. विठ्ठल महाराज यांच्या गाडीचा टायर फुटल्या कारणाने झालेल्या किरकोळ अपघातात विठ्ठल महाराज व गाडीचे चालक हे दोंघे या अपघातात किरकोळ जखमी झाले होत त्यांच्यांवर पुणे येथील रुबी हॉल रुग्णालयात उपचार सुरू होते त्यांच्या पायाची शस्त्रक्रिया झाली होती आज दि.११जून रोजी श्री विठ्ठल महाराजांना उपचार पूर्ण होऊन डिचार्ज दिला गेला आहे व गहिनीनाथ गड लगत असणारी त्यांची जन्मभूमी म्हसोबाचीवाडी येथे थांबून ग्रामदैवत म्हसोबाच्या चरणी नतमस्क होऊन ग्रामदैवताचे दर्शन घेतले व म्हसोबाचीवाडी व पंचक्रोशीतुन आलेल्या भाविकांनी व ग्रामस्ताकडून महंत विठ्ठल महाराज यांचे फुलांची उधळण करून्? स्वागत करण्यात आले महीलांकडून महंत. विठ्ठल महाराजांचे औक्षण करण्यात आले सर्व जमलेल्या भाविकांनी दर्शन घेऊन पुढील आरोग्यासाठी ग्रामदेवत

म्हसोबा चरणी साकडं देखील घातले याप्रसंगी म्हसोबावाडी व पंचक्राशीतील भक्तगण सोबत आमच्या दैनिक प्रतिनिधी प्रेम पवळ उपस्थित होते.

प्रा.डॉ.संतोष रणखांब यांचे मुंबई आकाशणीवरुन व्याख्यान

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठीवाडी येथील रहिवासी व कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठच्या प्राणिशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख व सहयोगी प्राध्यापक डॉ. संतोष रणखांब यांचे व्याख्यान १३ ते १६ जून चार दिवस सकाळी ६:५० मि. 'परिसर' या पर्यावरण विषयक कार्यक्रमात मुंबई आकाशणीवरून राज्यस्तरीय प्रसारण होणार आहे.

या कार्यक्रमात मुंबई आकाशणीवरून दि. १३ व १४ जुन रोजी पिक पद्धती व पर्यावरण, दि. १५ रोजी पारंपारिक परिस्थितीकीय ज्ञान तर १६ जुन रोजी पर्यावरण व जैव भौगोलिक क्षेत्र या विषयावर सकाळी ६:५० मि. परिसर या पर्यावरण विषयक कार्यक्रमात व्याख्यानाचे प्रसारण मुंबई आकाशणीवरून इतर सर्व केंद्र सहक्षेपीत करणार आहेत. या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन बाबुराव वराडे, दत्तात्रय वैराळ, दशरथ खेत्री, भागवत खेत्री, संभाजी पाष्टे, सुनिल हिवरकर, सुदर्शन हिवरकर, शेख रशिद, विष्णू दहिभाते, अॅड. पांडुरंग गोंडे, राजाभाऊ तपसे यांच्यासह सर्व रेडीओ श्रोता संघ मोठीवाडीच्या सदस्यांनी केले आहे.

कापूस लागवड तंत्रज्ञान विषयावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन

रिलायन्स फाउंडेशन व कृषी विज्ञान केंद्र खामगाव यांचा उपक्रम

माजलगाव । प्रतिनिधी

या वर्षी जिल्ह्यात मान्सूनचे जोरदार आगमन झाले आहे.त्यामुळे रब्बी पिकांच्या पेरणीला वेग आलेला आहे.मे महिन्यात झालेला अवकाळी पाऊस आणि त्या पाठोपाठ लगेच मान्सूनचे आगमन यामुळे शेतकऱ्यांमध्ये उल्हासाचे वातावरण निर्माण झाले आहे.जिल्ह्यामध्ये कापूस हे पीक जास्त प्रमाणात घेतल्या जाते त्यामुळे कापूस पिकाचा पेरा ही जास्त आहे आणि काही कापूस बियाणेच्या वाणांना जिल्ह्यात जास्त मागणी असल्या कारणाने एम.आर.पी.च्या वर कापूस बॅग विकल्या जाता आहेत.त्यामुळे शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने रिलायन्स फाउंडेशन व कृषी विज्ञान केंद्र खामगाव यांच्या संयुक्त विद्यमाने दि ११ जुन मंगळवार रोजी कापूस लागवड तंत्रज्ञान या विषयावर व्हाट्सअप ग्रुप चॅटद्वारे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.या कार्यक्रमाला मुख्य मार्गदर्शक म्हणून वसंतराव नाईक कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र खामगाव तालुका गेवराई जिल्हा बीड येथील शास्त्रज्ञ डॉक्टर हनुमान गरुड,विषय विशेषज्ञ कृषी विद्या यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना जो शासनाने बियाण्याचे भाव निश्चित करून दिले आहेत.

◀◀ पान ३ वर

न्यायालयीन प्रकरणांचा त्वरित लागणार निकाल

सर्वोच्च न्यायालयातर्फे विशेष लोकअदालत

बीड । प्रतिनिधी

सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली येथे दिनांक २९ जुलै ते ३ ऑगस्ट २०२४ या कालावधीमध्ये विशेष लोक अदालत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

या लोकअदालतीमध्ये सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली प्रकरणे तडजोडीसाठी ठेवली जाणार आहेत. जिल्हयातील ज्या पक्षकारांची प्रकरणे सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असतीलव ती तडजोडीने मिटवावीत अशी ज्यांची इच्छा असेल अशी प्रकरणे विशेष लोकअदालतीमध्ये ठेवता येऊ शकतात. उपरोक्त लोकअदालतीमध्ये पक्षकार प्रत्यक्ष किंवा आभासी पध्दतीने सहभाग घेऊ शकतात. जिल्हयातील प्रकरणे सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष लोकअदालती मध्ये ठेवण्यासाठी संबंधित वकिलांना कल्पना द्यावी किंवा अधिक माहितीसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड किंवा संबंधित तालुका विधी सेवा समिती यांच्याकडे संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव जी.जी.सोनी यांनी केले आहे.

समाज माध्यमातून ओबीसी नेते, संत, महंत, अधिकारी यांच्यावर चिखलफेक करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात सातत्याने समाज माध्यमातून ओबीसी घटकांतील नेते, संत, महंत, अधिकारी, व्याख्याते, कीर्तनकार यांना टार्गेट करून सोशल मीडियाद्वारे वेगवेगळ्या, कॉमेंट करून अश्लील व अपशब्द वापरले जात आहेत. त्यामुळे अशा विकृत लोकांवर गुन्हे दाखल करून प्रतिबंधात्मक कारवाई करावी, अशी मागणी अंबाजोगाई येथे सकल ओबीसी समाज बांधवांच्या वतीने उपजिल्हाधिकारी दीपक वजाळे यांच्याकडे करण्यात आली आहे. याचे निवेदन पोलिस उपअधीक्षक, पोलिस निरीक्षक यांना देण्यात आले आहे.

अंबाजोगाई येथे आज सकल ओबीसी समाज बांधवांच्या वतीने उपजिल्हाधिकारी यांना विस्तृत असे निवेदन देण्यात आले आहे. बीड जिल्ह्यात लोकसभा निवडणूक सुरू झाल्यापासून ओबीसी समाज बांधवांना लक्ष करून समाज माध्यमांवर टीका-टिप्पणी केली जात आहे. प्रामुख्याने कृषी मंत्री ना. धनंजय मुंडे, माजीमंत्री पंकजाताई मुंडे व ओबीसी समाजातील अधिकारी, संत, महंत, व्याख्याते यांना टार्गेट करून त्यांच्यावर खालच्या पातळीवर टीका केली जात आहे. समाजमाध्यमाचा दुरूपयोग होत असून याचा परिणाम येणार्या काळात सामाजिक स्वास्थ्य बिघडण्यात होईल अशी भीती निवेदनकर्त्यांनी केली आहे. फेक अकाऊंट काढून विनाकारण प्रतिमा मलिन करून पंकजाताई मुंडे व धनंजय मुंडे यांच्याविषयी अश्लील व घाणरेड्या शब्दांमध्ये पोस्ट टाकल्या जात आहेत. ओबीसी समाजाला टार्गेट करून हा प्रयत्न काही विघ्नसंतोषी मंडळींकडून केला जात असल्याचे या निवेदनात नमूद करण्यात आले. तरी बीड जिल्ह्याच्या प्रशासनाने आणि पोलिस विभागाने याची तात्काळ दखल घेऊन संबंधितांवर गुन्हे दाखल करून प्रतिबंधात्मक कारवाई करावी असे नमूद केले आहे. अन्यथा पुढील परिणामांस जिल्हा प्रशासन कारणीभूत राहिल असेही स्पष्ट करण्यात आले आहे. या संबंधीचे पुरावे निवेदनासोबत जोडले आहेत. निवेदन देण्यासाठी असंख्य ओबीसी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कृषी कन्यांनी शेतकऱ्यांना दिली बिजांकुरण प्रात्याक्षिकाची माहिती

सौ.के.एस.के. (काकू) कृषी महावि
ग्रामीण जागरुकता कार्यानुभव कार्यक्र
Rural Awareness Work Experience
आणि
कृषि औद्योगिक संलग्नता
Agro Industrial Attachme
मौजे:- नवगण राजुरी ता.

राजुरी । प्रतिनिधी

सौ.के.एस.के.(काकू)कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी बिजांकडून या विषयावर प्रात्याक्षीकाद्वारे शेतकर्यांना माहिती दिली.

योग्य नियोजना अभावी दरवर्षी शेतकर्यांना बियाणे न उगवल्यामुळे दुबार पेरणीची वेळ येते त्यामुळे या प्रात्यक्षिकामुळे बियाण्याची उगवण्याची क्षमता पेरणीपूर्वीच चाचणी करून घेणे गरजेचे आहे. विद्यार्थिनींनी शेतकर्यांना बिजांकुरण प्रदर्शनाबद्दल सविस्तर माहिती दिली. सोयाबीन या पिकाचे प्रात्यक्षिक करून दाखविले. यावेळी

◀◀ पान ३ वर

अखेर लिंबागणेश येथील मुळेवस्ती रस्ते कामास सुरूवात

तब्बल ७५ वर्षानंतर रस्त्याचा प्रश्न सुटला –डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश । प्रतिनिधी

स्वातंत्र्यानंतर ग्रामीण भागात दळणवळणाची साधने व्हावीत यासाठी मनरेगा तसेच मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ते योजनेंतर्गत कोट्यवधींचा निधी शासनाकडून गावपातळीवर खर्च करण्यात आला.मात्र काही वस्ती यापासून वंचित असल्याने ग्रामस्थांना लोकसहभागातून रस्ते करण्याची वेळ आली आहे.अखेर यावर्षी मुलांच्या शालेय शिक्षण, दवाखाना, बाजारहाट तसेच खत बियाणे, भाजीपाला यांची पावसाळ्यात गुडघाभर चिखलातून वाहतूक करावी लागत होती.यावर्षी मात्र लिंबागणेशचे सरपंच बालासाहेब जाधव, उपसरपंच बाळकृष्ण थोरात, माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे, माजी उपसरपंच बाळकृष्ण मुळे,संदिप मुळे यांच्या पुढाकाराने १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतुन रस्तेकामास सुरूवात झाली असुन तब्बल ७५ वर्षानंतर मुळेवस्तीकरांना रस्ता मिळाला असुन अखेर रस्त्याचा पांग फिटला असं बोललं जाते.



वर्षभरापूर्वी रास्तारोको आंदोलन अखेर पावसाळ्यापूर्वी रस्ते कामास सुरुवात

लिंबागणेश येथील मुळेवस्ती या रस्त्याची दुरावस्था असुन ग्रामस्थांना पावसाळ्यात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो म्हणून रस्ता करण्यात यावा यासाठी ग्रामस्थांनी गेल्यावर्षी दि.०६ जुन २०२३ रोजी लिंबागणेश बसस्थानक येथे मांजरसुंभा ते पाटोदा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी मार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते.यावेळी गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप, शाखा अभियंता वाघ,स्थापत्य अभियंता अरविंद दुबाले, तहसिल प्रशासनाचे मंडळ अधिकारी वंजारे, तलाठी पोतदार, नेकनुर पोलिस स्टेशनचे सपोनी विलास हजारे यांनी घटनास्थळी भेट देऊन रस्त्याची पाहणी करत पावसाळ्यापूर्वी रस्ता काम करण्याचे आश्वासन दिले होते.अखेर पावसाळ्यापुर्वी रस्तेकामास सुरूवात झाली असुन रस्त्याचा प्रश्न मिटला आहे.रास्ता रोको आंदोलनात माजी सरपंच कल्याण वाणी, सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ,विक्रांत वाणी, श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात, महादेव कुदळे अभिजित गायकवाड, पांडुरंग वाणी, संजय घोलप, वैजनाथ भोसले, रामकिसन गिरे आदि ग्रामस्थ सहभागी होते.

प्रभाकरअप्पा कोलंगडे यांच्या एकषष्ठी अभिष्टचिंतन सोहळ्यास उपस्थित रहावे –अनिल घुमरे

बीड । प्रतिनिधी

भारतीय संग्राम परिषदेचे जिल्हाध्यक्ष तथा स्व.लोकनेते विनायकरावजी मेटे साहेब यांचे सहकारी शिवसंग्रामचे ज्येष्ठ नेते प्रभाकर अप्पा कोलंगडे यांच्या एकसष्ठी निमित्त अभिष्टचिंतन सोहळयाचे आयोजन गुरुवार,दिनांक १३ जून रोजी समर्थ मंगल कार्यालय, नगर रोड, बीड येथे करण्यात येत आहे.या अभिष्टचिंतन सोहळयास उपस्थित रहान्याचे आवाहन शिवसंग्रामचे जिल्हा सरचिटणीस तथा शहर प्रभारी अनिल घुमरे पा.यांच्यावतीने करण्यात येत आहे.

लोकनेते विनायकरावजी मेटे साहेब यांच्या शिवसंग्राम संघटनेतील ज्येष्ठ नेते प्रभाकर कोलंगडे यांची एकसष्टी अभिष्टचिंतन सोहळा संपन्न होणार आहे. शिवसेनेत असल्यापासून विविध चळवळीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर सामाजिक आणि राजकीय योगदान त्यानी दिलेले आहे . सन २०१४ नंतर स्वर्गीय विनायकरावजी मेटे साहेब यांचे सहकारी म्हणून त्यांनी शिवसंग्रामची धुरा प्रभावीपणे जिल्हाध्यक्ष या नात्याने निभावली. गोरगरिबांना मदतीचा हात दिला त्यांना योग्य मार्गदर्शन केले .कायम सेवाभावी वृत्तीने काम करणाऱ्या अप्पानी बीड तालुक्यातील विकासासाठी मोठे काम केले आहे. प्रभाकर आप्पा कोलंगडे यांचा अनुभवातून जिल्ह्यातील अनेक राजकीय व सामाजिक मात्तब्बर मंडळी त्यांच्यासोबत जोडलेली आहे.मोठी राजकीय व सामाजिक उंची गाठूनही सर्वसामान्य कार्यकर्त्यांसोबत आपुलकीने राहणारे आमचे आप्पा निराळेच आहेत. राजकीय आणि सामाजिक जीवनामध्ये अनेक चढ-उतार पाहिलेले प्रभाकर आप्पा कोलंगडे यांचा उद्या ६१ वा वाढदिवस समर्थ मंगल कार्यालय नगर रोड बीड येथे आयोजित केला आहे . या अभिष्टचिंतन सोहळयास शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. ज्योतीताई मेटे यांच्यासह सर्व शिवसंग्रामचे पदाधिकारी व राजकीय व सामाजिक जीवनातील सहकारी सर्वजण उपस्थित राहणार आहेत . आपली सर्वांची उपस्थितीही प्रार्थनीय आहे म्हणून या अभिष्टचिंतन सोहळ्यात उपस्थित रहावे असे आवाहन शिवसंग्रामचे जिल्हा सरचिटणीस तथा शहर प्रभारी अनिल घुमरे पा. यांच्यावतीने करण्यात येत आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

पूर व्यवस्थापनाच्या कामासाठी ९८ कोटी स्थायी समितीकडून मंजूर

पुणे । प्रतिनिधी

शहरात झालेल्या मुसळधार पावसामुळे दाणादाण उडालेली असताना प्रशासनावर सडकून टीका केली जात आहे. नाले सफाई न करणे, पावसाळी गटारांची स्वच्छतेकडे दुर्लक्ष केल्याने ही परिस्थिती ओढवलेली आहे.

असे असताना आज (ता. ११) केंद्र सरकारच्या योजनेतून पुणे शहरा पूर स्थिती रोखण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना केली जाणार असून, त्या कामाच्या ९७ कोटी ९४ लाख रुपयांच्या निविदेला स्थायी समितीने मान्यता दिली. यातून शहराच्या विविध भागात पूर स्थिती रोखण्यासाठी कामे केली जाणार आहेत.

केंद्र सरकारने अर्बन फ्लड रिस्क मॅनेजमेंट (शहरी पूर जोखीम व्यवस्थापन) योजना तयार केली आहे. यामध्ये पुणे, मुंबईसह चेन्नई, कोलकता, बंगळूर, हैदराबाद, अहमदाबाद या सात शहरांचा समावेश असून, या शहरांमध्ये पूर स्थिती रोखण्यासाठी अडीच हजार कोटी रुपयांची योजना तयार केलेली आहे.

वरं जनहितं ध्येयम्
पुणे महानगरपालिका

यामध्ये पुणे महापालिकेला पुढील पाच वर्षात २५० कोटी रुपये मिळणार आहेत. महापालिकेने तयार केलेल्या आराखड्याला राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने मंजुरी दिलेली आहे. शहरातील पूरस्थिती टाळण्यासाठी मूलभूत बदलांसह तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. पुढील पाच वर्षात १४ व्या आणि १५व्या वित्त आयोगातून पुणे शहराला हा निधी उपलब्ध होईल.या कामाचे पाच टप्पे असून पहिल्या टप्प्यात पावसाळी गटार टाकणे, काँक्रिट कॅनॉल करणे, भूजल पातळी वाढविण्यासाठी उपाययोजना करणे, नाला खोलीकरण करणे, डोंगरावर चर खोदून पावसाचे पाणी जिरवणे अशा उपाययोजना केल्या जाणार आहेत. यासाठी १४७ कोटी रुपयांचे पूर्वगणनपत्रक तयार करण्यात आले होते.

त्याची निविदा मार्च महिन्यातच मान्यतेसाठी ठेवण्यात येणार होती, पण आचारसंहितेपर्यंत प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण न झाल्याने हा प्रस्ताव रखडला होता. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता उठल्यानंतर पहिल्याच बैठकीत प्रशासक डॉ. राजेंद्र भोसले यांनी स्थायी समितीच्या बैठकीत या प्रस्तावास मान्यता दिली.

या कामासाठी मागविलेल्या निविदेत पाटील कंस्ट्रक्शन अँड इंफ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनीने १६.२१ टक्के कमी दराने निविदा भरली. ही निविदा पात्र ठरल्यानंतर आज स्थायी समितीमध्ये ९७ कोटी ९४ लाख ६९ हजार ८४२ रुपयांची निविदा मान्य झाली आहे.

ही होणार कामे

- आराखड्यामध्ये सर्वाधिक जोखीम असलेल्या ६० ठिकाणी उपाययोजना करणार - शहराच्या विविध भागात ६०० मिमी, ९०० मिमी, १ हजार मिमी व्यासाच्या पावसाळी गटार टाकणार
- १२०० ठिकाणी भूजल पातळी वाढविण्यासाठी रिचार्ज बोअर घेणार
- शहरातील प्रमुख नाले खोल करून पुराचा धोका कमी करणार - शहरात अनेक टेकड्या आहेत, तेथे चर खोदून पाणी जिरवण्यावर भर देणे

मुरलीधर मोहोळांनी स्वीकारला राज्यमंत्रीपदाचा कार्यभार,अमित शाहांचे घेतले मार्गदर्शन

पुणे । प्रतिनिधी

लोकसभा मतदारसंघाचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनी केंद्रीय राज्यमंत्रीपदाची शपथ घेतलेल्या आज (ता. ११) सहकार मंत्रालयाच्या राज्यमंत्रीपदाचा कार्यभार स्वीकारला. त्यावेळी मंत्रालयाचे केंद्रीय सचिव डॉ. आशिष कुमार भूटानी यांनी मोहोळ यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. त्यापूर्वी त्यांनी केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांची भेट घेऊन मार्गदर्शन घेतले.

सत्यमेव जयते
सहकारिता मंत्रालय

सहकार मंत्रालयाचा कार्यभार स्वीकारल्यावर मोहोळ यांनी अधिकाऱ्यांकडून कशा पद्धतीने काम चालते, राज्यमंत्र्यांची जबाबदारी काय असते, निर्णय कसे होतात, देशभरातील महत्त्वाच्या संस्थांबद्दल त्यांनी अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सहकार मंत्री अमित शाह यांच्या मार्गदर्शनाखाली सहकार खात्याचे काम करण्याची संधी मिळाली आहे. महाराष्ट्रातील आणि देशातील सहकार चळवळीला बळ देणे, सहकार क्षेत्राबद्दल सामान्य नागरिकांमध्ये विश्वासार्हता निर्माण करण्याचे काम प्राधान्याने करणार आहे.

सहकार मंत्रालय महाराष्ट्राच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे. सहकाराची पाळेमुळे देशाच्या ग्रामीण भागात पसरली असून या मंत्रालयामार्फत ग्रामीण जनतेसाठी काम करता येईल याचे मोठे समाधान आहे.

शहांकडून कौतुकाची थाप

मोहोळ यांनी पदभार स्वीकारण्यापूर्वी सहकार मंत्री शाह यांची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी शाह यांनी मोहोळ यांच्या पाठीवर थाप टाकत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

चक्रपाणी वसाहत येथे डबक्यात पडून चिमुरड्याचा मृत्यू

पिंपरी । प्रतिनिधी

घराच्या अंगणात खेळत असताना पावसाच्या पाण्याने भरलेल्या डबक्यात पडून तीन वर्षाच्या चिमुरड्याचा मृत्यू झाला. ही घटना सोमवारी (दि. १०) दुपारी अडीचच्या सुमारास चक्रपाणी वसाहत भोसरी येथे घडली. गणेश बालाजी मंजलवार (वय ३) असे मृत्यू झालेल्या चिमुरड्याचे नाव आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन फटांगरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, मंजलवार कुटुंबीय भोसरी येथील चक्रपाणी वसाहतीमध्ये राहतात त्यांच्या घरासमोरील मोकळ्या मैदानात मोठ-मोठे खड्डे पडले असून त्यामध्ये पावसाचे पाणी साचले आहे. दरम्यान, सोमवारी दुपारी अडीचच्या सुमारास चिमुरडा गणेश मित्रांसोबत अंगणात खेळत होता. त्यावेळी तोल गेल्याने गणेश डबक्यात पडला. गणेशसोबत खेळत असलेल्या मुलांनी त्याच्या आईला याबाबत माहिती दिली. आईने धावत जाऊन गणेशला डबक्याबाहेर काढले. गणेशला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी जाहीर केले. गणेशच्या मृत्यूमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. याप्रकरणी पोलिसांनी अकस्मात मृत्यू अशी नोंद केली असून याबाबत अधिक तपास पोलिस उपनिरीक्षक सुहास गाडे करत आहेत.

स्मार्ट प्रकल्पामार्फत प्रमुख वित्तीय संस्थासोबत राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन

पुणे । प्रतिनिधी

राज्यातील शेतकरी उत्पादक कंपन्याना कर्जपुरवठा होण्यासाठी तसेच समुदाय आधारित संस्था (सीबीओ) आणि बँकांमधील सुसंवाद वाढविण्यासाठी प्रमुख वित्तीय संस्थांच्या एक दिवसीय कार्यशाळेचे नुकतेच आयोजन करण्यात आले.

स्मार्टचे प्रकल्प संचालक डॉ. हेमंत वसेकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या कार्यशाळेस स्मार्ट प्रकल्प समन्वयक जीवन बुंदे, स्मार्टचे अतिरिक्त प्रकल्प संचालक ज्ञानेश्वर बोटे, स्मार्टचे वित्त तज्ञ अश्विनी मुसळे, मेघराज कांबळे यांच्यासह विविध बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी डॉ. वसेकर म्हणाले, स्मार्ट प्रकल्प हा महाराष्ट्र शासनाचा महत्वाकांक्षी प्रकल्प असून शेतकरी उत्पादक कंपन्यांना ६० टक्के अनुदान देण्याचा हा भारतातील पहिला प्रकल्प आहे. याअंतर्गत ग्रामीण भागात गोदाम, कांदाचाळी, शीतगृह, प्राथमिक व मूल्य वर्धित प्रकल्प आदी काढणीपश्चात पायाभूत सुविधा उभे राहणार असून त्यामुळे शेतमालास चांगला भाव मिळण्यास मदत होणार आहे. आरबीआयच्या नियमानुसार बँकांनी कृषी क्षेत्रात १८ टक्के कर्ज पुरवठा करणे आवश्यक आहे. स्मार्ट प्रकल्पातील शेतकरी उत्पादक कंपन्याना कर्ज पुरवठा केल्यास बँकांचे कृषी क्षेत्रातील कर्ज पुरवठा करण्याचे लक्ष साध्य होईल व शेतकरी उत्पादक कंपन्यांनाही वेळेत कर्ज मिळण्यास मदत होईल. यासाठी सर्व बँकांनी स्मार्ट प्रकल्पासमवेत सामंज्यस्य करार करावा व शेतकरी उत्पादक कंपन्याना कर्ज पुरवठा करावा, असे आवाहनही त्यांनी केले. श्री. बुंदे यांनी स्मार्ट प्रकल्पांअंतर्गत समुदाय आधारित संस्थांसाठी विशेष रचना केलेल्या उत्पादक भागीदारी उपप्रकल्प आणि बाजारपेठ संपर्क वाढ उपप्रकल्पांबाबत सविस्तर माहिती देवून बँकांनी पुढे येवून समुदाय आधारित संस्थांना कर्ज पुरवठा करावा असे आवाहन केले.

श्रीमती मुसळे यांनी स्मार्ट प्रकल्पांतर्गत निधी प्रवाहाबाबत सादरीकरणाद्वारे माहिती दिली, तर श्री. बोटे यांनी सर्व बँकांना स्मार्ट प्रकल्पासोबत सामंजस्य करार करून समुदाय आधारित संस्थांना आवश्यक कर्ज पुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी सहयोग करण्याची विनंती केली. श्री. कांबळे यांनी कृषी पायाभूत सुविधा निधीबाबत सविस्तर माहिती देवून स्मार्ट प्रकल्पातील सर्व उपप्रकल्प राष्ट्रीय कृषी पायाभूत वित्तपुरवठा योजनेचे लाभार्थी असून याबाबत स्वतंत्र कक्ष उभारण्यात आल्याचे सांगितले. कार्यशाळेतील चर्चासत्रादरम्यान बँकांच्या प्रतिनिधीद्वारे उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांबाबत विचारविनिमय आणि मार्गदर्शन करण्यात आले. बँकांनी स्मार्ट प्रकल्पातील समुदाय आधारित संस्थाना कर्ज मंजूरी देण्यास सकारात्मकता दर्शविली. प्रकल्पांतर्गत ३७० शेतकरी उत्पादक कंपन्यांना विविध बँकामार्फत कर्ज मंजूर झालेली असून त्यामध्ये बँक ऑफ महाराष्ट्र, एचडीएफसी बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया व बँक ऑफ बरोदा आदी बँकांचा मोठा वाटा आहे, असे यावेळी सांगण्यात आले.कार्यशाळेस बँक ऑफ महाराष्ट्र, एचडीएफसी, स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बरोदा, कॅनरा बँक, आयडीबीआय, एयु स्मॉल फायनान्स बँक, विदर्भ कोकण ग्रामीण बँक, युसीओ, ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था, रत्नाकर बँक, आयसीआयसीआय, महाराष्ट्र ग्रामीण बँक, पंजाब नॅशनल बँक, इंडियन ओव्हरसीज बँक, युनायटेड बँक ऑफ इंडिया, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, सीएसबी, आयडीएफसी व क्सीस बँक आदी प्रमुख वित्तीय संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

वसंतराव नाईक महामंडळाच्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

पुणे । प्रतिनिधी

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील नागरिकांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

महामंडळामार्फत २५ टक्के बीज भांडवल योजना, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना आणि १ लाख थेट कर्ज योजना राबविण्यात येतात. वैयक्तिक कर्ज व्याज परतावा व गट कर्ज व्याज परतावा योजना या राष्ट्रीयकृत बँका, राज्यस्तरीय बँकर्स समिती सदस्य असलेल्या बँकांसह इतर सहकारी बँका, नागरी बँका, सर्व शेड्युल व मल्टीशेड्युल बँकांच्या माध्यमातून राबविण्यात येतात.

राष्ट्रीयकृत बँका व जिल्हा मध्यवर्ती बँकाच्या माध्यमातून २५ टक्के बीज भांडवल योजना राबविण्यात येते. योजनेसाठी अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्ष असावे. बँकांचा सहभाग ७५ टक्के असून व्याजदर बँकाच्या नियमाप्रमाणे लागू राहील. महामंडळाचा सहभाग २५ टक्के रकमेवर व्याजदर ४ टक्के आहे. या योजनेत महत्तम प्रकल्प मर्यादा ५ लाख रुपयांपर्यंतची आहे. अर्जदाराचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न शहरी भागाकरिता १ लाख रुपये तर ग्रामीण भागाकरिता ९८ हजार रुपयापर्यंत असावे.वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेंतर्गत कृषी संलग्न व पारंपरिक उपक्रमांसाठी, लघू, मध्यम उद्योगांचे उत्पादन व विक्रीसाठी व सेवा क्षेत्रांसाठी कर्ज वितरित करण्यात येते. महत्तम कर्ज मर्यादा १० लाख रुपयांपर्यंत आहे. अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्ष दरम्यान असावे, अर्जदाराचे कर्ज खात्याची आधार जोडणी असणे अनिवार्य आहे. महामंडळाच्या ु.ींक्षपीं.ळप या संकेतस्थळावर नाव नोंदणी करणे अनिवार्य राहील. अर्जदार हा कोणत्याही बँकेचा थकबाकीदार नसावा. अर्जदाराने यापूर्वी महामंडळाच्या किंवा इतर महामंडळाच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा. कर्ज रकमेचे हप्ते नियमित भरल्यास व्याजाची रक्कम (१२ टक्के मर्यादेत) व्याज परतावा रक्कम अनुदान स्वरुपात लाभार्थ्याच्या बँक खात्यावर जमा करण्यात येईल.गट कर्ज व्याज परतावा योजनेकरिता कर्जाची मर्यादा १० लाख ते ५० लाख रुपयापर्यंत असून या योजने अंतर्गत लाभ घेण्याकरिता नोंदणीकृत गट असावा. गटातील सदस्य हे विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील असावेत. गटातील सदस्याचे वय १८ ते ४५ वर्ष पर्यंत असावे. गटातील लाभार्थीचे कर्ज खाते आधारकार्ड लिंक असणे आवश्यक आहे. गटातील प्रमुख सदस्याने महामंडळाच्या महामंडळाच्या ु.ींक्षपीं.ळप या संकेतस्थळावर नाव नोंदणी करणे अनिवार्य राहील. गटातील सर्व लाभार्त्यांचे प्रमाणित वार्षिक कौटुंबिक उत्पन्न, नॉन क्रिमिलेअरकरिता असलेल्या कौटुंबिक उत्पन्न ८ लाखाच्या मर्यादेत असावे.

१ लाख रुपयांपर्यंत थेट कर्ज योजनेमध्ये महामंडळाकडून १ लाख रूपयाचे थेट कर्ज दिले जाते. अर्जदाराचे वय १८ ते ५५ वर्ष, कौटुंबिक वार्षिक उत्पन्न शहरी भागाकरिता १ लाख रुपये तर ग्रामीण भागाकरिता ९८ हजार रुपयापर्यंत असावे. लाभार्थ्यांना कोणताही हिस्सा भरावा लागणार नाही. नियमित ४८ समान मासिक हप्त्यांमध्ये मुद्दल २ हजार ८५ रुपये परतफेड करणाऱ्या लाभार्थ्यांना व्याज अदा करावे लागणार नाही. परंतु थकीत हप्त्यांवर दर साल दर शेकडा ४ टक्के व्याजदर आकारण्यात येईल. जिल्ह्यातील इच्छुक लाभार्थ्यांनी अर्ज करण्यासाठी व अधिक माहितीसाठी वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्या.) डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 'बी' विंग, तळमजला, मेंटल हॉस्पिटल कॉर्नर, येरवडा पुणे, दूरध्वनी क्र. ०२०-२९७०३०४९ येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक एस. आर. बडगुजर यांनी केले आहे.

११ कोटीच्या कामात मोठा गैरप्रकार; एसआयटी चौकशी करा, खासदार सुप्रिया सुळेंचा आरोप

पुणे । प्रतिनिधी

ड्रेनेज, पावसाळी लाईनसह रस्त्याचे नियोजन करणे आवश्यक आहे. पुन्हा पुन्हा रस्ते खोदाई नको आहे. शहर व उपनगर मान्सूनपूर्व पावसाने रस्त्यांना आलेले ओढ्या-नाल्याचे स्वरूप आले असून पावसाळीपूर्व ११ कोटीच्या कामात मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाला असून याची एसआयटी चौकशी झाली पाहिजे अशी मागणी करत पालिका प्रशासनाच्या कारभारावर बारामती लोकसभा मतदारसंघाच्या नवनिर्वाचित खासदार सुप्रिया सुळे यांनी ताशेरे ओढले.

'कात्रज ते नवले पूल बाह्यवळण महामार्ग व वंडरसिटी ते माऊली नगर उड्डाणपुलाच्या कामाला गती देण्यासाठी पुढील आठवड्यात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना भेटणार असून गडकरी साहेबांनी निधी दिला असल्याने काम सुरू आहे.

मात्र त्याला गती देणे गरजेचे असल्याचे सुळे म्हणाल्या. यावेळी राष्ट्रवादीचे अध्यक्ष प्रशांत जगताप, माजी नगरसेवक विशाल तांबे, अमृता बाबर, नमेश बाबर, दीपक गुजर, अनिल कोंढरे यांच्यासह राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महापालिकेचे अधिकारी उपस्थित होते.

...तर रस्त्यावर उतरून आंदोलन करू

पुणे शहरात सातत्याने क्राईम, ड्रग्ज प्रकार वाढत आहेत. तसेच, मूलभूत सुविधा व विकास कामात पालिका प्रशासन कमी पडत आहे. यावरून पुण्यात पालिका व पोलीस प्रशासन नक्की आहे की नाही समजत नाही. या विरोधात लोकप्रतिनिधी म्हणून नागरिकांसाठी रस्त्यावर उतरून आंदोलन करू असा इशाराही सुळे यांनी यावेळी दिला

विधान परिषद निवडणुकीत मतांची फाटाफूट

पुणे । प्रतिनिधी

विधानपरिषदेच्या आगामी ११ जागांची निवडणूक सत्ताधारी महायुतीची परीक्षा पाहणारी ठरणार आहे. या निवडणुकीत आमदारांच्या मतांची फाटाफूट होण्याची शक्यता असून, त्यामुळे राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा ढवळून निघणार आहे. विधिमंडळाच्या येत्या अधिवेशनात ही निवडणूक होण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दोन वर्षांपूर्वी राज्यातील सत्तांतराला सुरवात केली होती, त्यावेळी विधानपरिषदेच्या दहा जागांच्या निवडणुकीनंतरच केली होती. त्यावेळी निवडणुकीच्या मतदानाला तत्कालीन सत्ताधारी महाविकास आघाडीची काही मते फुटली होती. त्यात काँग्रेसच्या एका उमेदवाराचा पराभव झाला. त्या मतदानानंतर विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंसह शिवसेनेचे अनेक आमदार सुरतमार्गे गुवाहाटीकडे रवाना झाले. त्यांच्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात शिवसेनेने याचिका दाखल केली होती. त्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेली सुनावणीही येत्या ८ जुलैला न्यायालयाची उन्हाळी सुटी संपल्यानंतर त्वरित घेण्याची मागणी शिवसेनेकडून होऊ शकते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कोणाचा, याचीही सुनावणी याच कालावधीत होणार आहे. आगामी विधानपरिषदेच्या निवडणुकीपूर्वी आमदारांच्या अपात्रतेबाबत निर्णय घेण्याची मागणी न्यायालयात केली जाऊ शकते.

राज्यसभेच्या ६ जागांसाठी दहा जून २०२२ रोजी, तर विधानपरिषदेच्या १० जागांसाठी २० जून २०२२ रोजी निवडणूक झाली होती. त्यावेळी २१ जून २०२२ रोजी एकनाथ शिंदे काही आमदारांसह सुरतला रवाना झाले होते. यावेळी पुन्हा ११ जागांसाठी निवडणूक होणार आहे.

विधानसभेतील ८ आमदार लोकसभा निवडणुकीत निवडून आले, तर काहींनी राजीनामा दिला आहे. त्यामुळे विधानपरिषदेच्या एका जागेसाठी सुमारे २४ मते आवश्यक असल्याचा अंदाज आहे. विधानसभेतील सध्याचे पक्षीय बलाबल पाहता, भाजपचे ५ जण, काँग्रेस, शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांचा प्रत्येकी एक उमेदवार निवडून येईल. उर्वरित तीन जागांसाठी आमदारांच्या मतांची मोठ्या प्रमाणात पळवापळव होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ६ वर्षांपूर्वी ही निवडणूक बिनविरोध झाली होती. यावेळी मात्र, सत्तारूढ महायुतीला त्यांचे उमेदवार निवडून आणण्यासाठी मोठी राजकीय जागरूकता ठेवावी लागेल, तर विरोधी पक्षाचे नेते काही जादा मते मिळविण्यासाठी प्रयत्नशील राहतील. सत्तारूढ गटातील विशेषतः शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही आमदारांनी विरोधी पक्षाकडे मते वळविल्यास, सत्तारूढ आघाडीचा उमेदवार पराभूत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शिवसेना (ठाकरे गट), राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष यांच्याकडे प्रत्येकी १४ ते १५ आमदारांचा गट आहे. तर, काँग्रेससह शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्याकडेही एक उमेदवार निवडून आल्यानंतर प्रत्येकी १४ ते १५ आमदार जादा असतील. त्यामुळे आणखी एखादा उमेदवार निवडून आणण्याकरिता त्यांच्यामध्ये मतांची जमवाजमव करण्यासाठी सर्वच पक्षांच्या राजकीय हालचाली गतिमान होण्याची शक्यता आहे. येत्या २७ जूनला विधिमंडळाचे अधिवेशन सुरू होत असून, यादरम्यान ही निवडणूक होण्याची शक्यता आहे.

११ सदस्यांच्या जागा होणार रिक्त

विधानपरिषदेच्या ७८ सदस्यांपैकी ३० सदस्य विधानसभेच्या आमदारांकडून मतदानाने निवडले जातात. त्यांच्यापैकी नीलय नाईक, राम पाटील रातोलीकर, रमेश पाटील, विजय गिरकर (चौघेही भाजप), डॉ. मनीषा कायंदे (शिवसेना), अनिल परब (शिवसेना उद्धव ठाकरे पक्ष), बाबाजानी दुर्राणी (राष्ट्रवादी काँग्रेस), वजाहत मिर्झा, प्रज्ञा सातव (दोघेही काँग्रेस), जयंत पाटील (शेकाप), महादेव जानकर (रासप) हे ११ सदस्य १० जुलै २०१८ रोजी बिनविरोध निवडून आले होते. त्यांची मुदत २७ जुलै पर्यंत आहे. यापैकी सातव ह्या २०२१ मध्ये रिक्त झालेल्या जागेवर निवडून आल्या आहेत. या जागांसाठी निवडणूक होणार आहे. शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघातील प्रत्येकी दोन जागांवरील निवडणूक प्रक्रिया सुरू झाली आहे. याव्यतिरिक्त स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मतदारसंघातून विधानपरिषदेवर निवडून गेलेल्या पाच सदस्यांच्या जागाही २१ जून रोजी रिक्त होणार आहेत. महापालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका न झाल्याने, त्यामधून विधानपरिषदेवर निवडून जाणाऱ्या किमान १४ जागा आता रिक्त होत आहेत. याव्यतिरिक्त राज्यपालांकडून नियुक्ती करण्यात येणाऱ्या १२ जागा रिक्त राहिल्या आहेत.